


१९३७-२०२६ | ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | बुधवार । दि. १४ ऑक्टोबर २०२६ । अंक १२८ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### युपीआय पेमेंट करणाऱ्यांना दिलासा

**नवी दिल्ली :** नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, दिवाळीच्या तोंडावर युपीआय पेमेंट करणाऱ्यांना दिलासा दिला आहे. केंद्र सरकारने घोषणा केल्याप्रमाणे २ हजार रुपयांहून अधिक रकमेच्या व्यापारी व्यवहारांवर लागू होणारे ०.४ टक्के शुल्क आता दिवाळीनंतर लागू होणार आहे. त्यामुळे १५ ऑक्टोबरपासून लागू होणारे मर्चंट डिस्काउंट रेट शुल्क आता दिवाळीनंतर लागू करण्यात येणार आहे. सणासुदीच्या काळात डिजिटल पेमेंट आणि खरेदी-विक्रीच्या व्यवहारांवर परिणाम होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदी-विक्रीचे •>पान २ वर

## वे|ध|क

### फेसबूक लाईव्ह दरम्यान हत्या

**चंदीगढ :** पंजाबमधील मानसा येथे अमली पदार्थांविरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते परविंदर सिंह झोटा यांची मंगळवारी (दि.१३) सकाळी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. एका औषधाच्या दुकानातून कृत्रिम अमली पदार्थ विकले जात असल्याचा आरोप करत झोटा यांनी थेट दुकानमालक अश्वनी कुमार याला जाब विचारला होता. धक्कादायक म्हणजे, या संपूर्ण वादाचे आणि हत्येच्या चित्रीकरण झोटा यांच्या 'फेसबुक लाइव्ह'मध्ये कैद झाले आहे. या गोळीबारात त्यांचा एक सहकारी गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, या लाइव्हच्या शेवटी झोटा यांनी कुमारने पाठीमागे शस्त्र लपवल्याचे सांगितले होते. तसेच, नुकतीच एका वृद्ध व्यक्तीने या दुकानातून अमली पदार्थ विकत घेतल्याचा उल्लेख त्यांनी केला होता.

# जिल्हा परिषद कर्जबाजारी! 139 कोटींची उधारी

**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

**कोट्यवधी रुपयांचा अर्थसंकल्प मांडणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेने एमआयडीसी अर्थात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे १३९ कोटी २७ लाख रुपयांचे पाणी बील थकविल्याची माहिती समोर आली आहे. रायगड जिल्हा परिषदेला वारंवार पत्र देऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे थकबाकीचा डोंगर वाढत असताना ग्रामीण भागातील पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतींकडून पाणीपट्टी वसूल होत असताना एवढी मोठी थकबाकी कशी साचली आणि जनतेकडून जमा होणाऱ्या पाणीकराचे नेमके काय होते, असा सवाल उपस्थित होत आहे.**

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या साधारणपणे १६ लाख ६४ हजार इतकी आहे. जिल्ह्यात दोन हजारहून अधिक गावे, व वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा विकास जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविला जातो. वेगवेगळ्या योजना जिल्हा परिषदेच्या मार्फत राबवून गावांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

पुर्वी जिल्हा परिषदेमार्फत राबविलेल्या पाण्याच्या योजनांद्वारे गावे, वाड्यांना नैसर्गिक स्त्रोतांमधून पाण्याचा पुरवठा केला जात होता. विहीरी, सार्वजनिक नळाद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. आता मात्र जिल्ह्यातील अनेक गावांना एमआयडीसीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. शुद्ध पाणी एमआयडीसीद्वारे पुरवठा केला जात आहे. त्यामुळे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत बंद झाले आहेत.

### काही थकबाकीवर दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| चेंढरे ग्रामपंचायत | 30,41,76,032 |
| तिनविरा पाणी पुरवठा योजना | 2,28,01,727 |
| रेवस पाणी पुरवठा योजना एक | 39, 26, 12,997 |
| रेवस पाणी पुरवठा योजना दोन (जलपाडा) | 2,66,11,533 |
| परहूरपाडा ग्रामपंचायत | 1,41,11,492 |
| कुरूळ ग्रामपंचायत | 4,35, 41,191 |
| खंडाळे ग्रामपंचायत | 2,09,35, 568 |
| थळ ग्रामपंचायत | 1,70,97,834 |
| नागोठणे ग्रामपंचायत | 16,23,31,139 |
| वेश्वी ग्रामपंचायत | 1,54,19,680 |
| सोगाव ग्रामपंचायत | 1,62,96,526 |




"एमआयडीसीचा मोठ्या प्रमाणात पाण्याचे बील थकीत आहे. ग्रामपंचायतींकडून पाणी पट्टी वसूली बाकी आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेला पाण्याचा कर उपलब्ध होत नाही. प्रादेशिक योजना चालू ठेवण्यासाठी जिल्हा परिषद सेसमधून देखभाल दुरुस्तीअंतर्गत काही निधीची तरतूद केली जाते. त्यातून एमआयडीसीला पाणी बिल वितरीत केले जाते. यावर्षी वीस लाख रुपयांचे बील वितरीत केले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील पाणी बील वसूल करण्यासाठी आता यंत्रणा कामाला लावली आहे.

–मोहन सरवदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद"

त्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावे एमआयडीसीच्या पाण्यावर अवलंबून आहेत.

"स्थानिक स्वराज्य संस्थाची दंडात्मक रकमेसह थकबाकीची रक्कम १३९ कोटी, २७ लाख १८ हजार ३४५ रुपये इतके थकीत आहे. याबाबत रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे. या थकबाकीबाबत भारताचे नियंत्रक महालेखा परिक्षक यांनी सुध्दा निरीक्षण नोंदविली आहेत. थकबाकीतील रक्कम महामंडळाला देण्यात यावी. अन्यथा टप्प्याटप्प्याने पाणी पुरवठा कमी करून ग्रामपंचायतींची नळ जोडणी खंडीत करण्याची कार्यवाही करावी लागेल.

– कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, विभाग, अलिबाग"

अलिबाग तालुक्यात विविध कंपन्या आहेत. या कंपन्यांच्या जलवाहीनीवरून ग्रामपंचायतींना एमआयडीसीद्वारे पाणी पुरवठा होतो. तिनविरा पाणी पुरवठा योजना, रेवस पाणी पुरवठा योजना एक व दोन, चेंढरे ग्रामपंचायत, परहूरपाडा, बामणगांव, खंडाळे, खानाव, थळ, काविर, वेश्वी अशा ४० हून अधिक ग्रामपंचायत हद्दीतील साधारणपणे १ लाख नागरिकांना एमआयडीसी अंतर्गत पाणी पुरवठा होत आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून पाण्याचे बील भरण्यात आखडता हात घेतल्याची बाब समोर आली आहे. एमआयडीसीमार्फत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून औद्योगिक क्षेत्राच्या व जलवाहिनीच्या आसपास स्थानिक स्वराज्य संस्थाना पिण्याचा पाण्याचा नाममात्र दराने पाणी पुरवठा करत आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून पाण्याचे देयके अदा केली जात नाही. त्यामुळे थकबाकीमध्ये प्रचंड वाढ होत आहे. याबाबत एमआयडीसी •>पान २ वर

### महिलेला पतीकडून अमानूष मारहाण

**नेरळ :** नेरळमधील खांडस येथील एका ३५ वर्षीय महिलेल्या तिच्या नवऱ्याने अमानूष मारहाण कल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ललिता ऐनकर असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. पती एकनाथ ऐनकर याने तिच्या डोक्यात मारल्याने गंभीर दुखापत झाली असून, ५४ टाके पडले आहेत. तसेच, उजवा पाय फ्रॅक्चर केला आहे. चारित्र्यावर संशय घेत ही मारहाण केली असून दारूच्या नशेत अमानुष मारहाण केल्याची माहिती समोर आली आहे. मिळाळेल्या माहितीनुसार, खांडस येथील ऐनकर दाम्पत्यांमध्ये अनेकवेळा भांडण होत होती. त्यामुळे या बाबत •>पान २ वर

## कस्तुरी लॉजिस्टिक्सची शेड कोसळली

### एकाचा मृत्यू; २५ कामगार जखमी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील माणकिवली गावाजवळ कस्तुरी लॉजिस्टिक्सच्या वेअरहाऊसचे बांधकाम सुरू असताना मंगळवारी (दि.१३) सकाळी लोखंडी शेड कोसळून भीषण दुर्घटना घडली. या घटनेत २५ कामगार जखमी झाले असून, एका कामगाराचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आहे. तसेच, जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.



खालापूर तालुक्यातील माणकिवलीजवळ सुमारे ४० एकर परिसरात वेअरहाऊस उभारणीचे काम सुरू होते. त्यावेळी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास अचानक शेडचा लोखंडी सांगाडा कोसळला. त्यामुळे कामाच्या ठिकाणी एकच धावपळ उडाली. काही कामगार ढिगाऱ्याखाली अडकले, तर अनेक जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच बचावकार्य सुरू करून जखमींना खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शेड कोसळण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, एवढ्या मोठ्या बांधकामादरम्यान लोखंडी सांगाड्याची रचना, वापरण्यात आलेले साहित्य आणि उभारणीच्या कामाची गुणवत्ता याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याचीही तपासणी होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. तसेच, या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी घटनास्थळाची तांत्रिक पाहणी करून सखोल चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे. तसेच, मृत कामगाराच्या कुटुंबीयांना तसेच जखमी कामगारांना नियमानुसार मदत मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## शेकापतर्फे आज महाभोंडला

### अलिगबागमध्ये श्रेया बुगडे यांची विशेष उपस्थिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नवरात्रौत्सवानिमित्त शेतकरी कामगार पक्ष अलिबाग शहर महिला आघाडी तर्फे महाभोंडला आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा अलिबागमधील श्रीबाग येथील स्व. नमिता नाईक क्रीडा संकुलात बुधवारी (दि.१४) सायंकाळी ४ ते ७. या वेळेत रंगणार आहे. या कार्यक्रमासह स्पर्धेचे विशेष आकर्षण अभिनेत्री श्रेया बुगडे या ठरणार आहेत.

नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून महाभोंडल्याचा हा मोठा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम शेतकरी कामगार




पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे आणि अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमादरम्यान, शब्दावरून उखाणा आणि फुगा फेम अशा विविध स्पर्धा पार पडणार आहेत. तसेच, या कार्यक्रमात भोंडला उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वीतीय क्रमांकास ७ हजार रुपये व तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये असे बक्षीस दिले जाणार आहे. त्याचबरोबर आकर्षक पारंपारिक वेशभूषा करणाऱ्या प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ७ हजार रुपये व तृतीय क्रमांकास ५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शेकाप अलिबाग शहर महिला प्रमुख डॉ. निलम हजारे, सहप्रमुख ॲड. अश्वीनी ठोसर, सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा संशय

**अलिबाग :** मुरूड तालुक्यातून १७ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. कुटुंबीय चिंतेत असून, तिचा शोध घेण्याची मागणी होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोलमांडला येथील अल्पवयीन मुलगी दि.१० ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास भोईघर फाटा येथील दुकानातून जाऊन येते, असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र, बराच वेळ उलटूनही ती घरी परतली नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी आसपासच्या परिसरात आणि नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. मात्र, ती आढळून आली नाही. अखेर मुलीच्या आजीने पोलिसांकडे धाव घेत तिचे अपहरण केल्याचा संशय व्यक्त करून तक्रार दाखल केली आहे.

## ढोकशेत धरणात बुडून मृत्यू

### अथक शोधमोहिमेनंतर मृतदेह सापडला

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील ढोकशेत येथील धरणात पोहण्यासाठी गेलेले दहिगाव येथील दत्तू वाघमारे (४४) हे रविवारी (दि.११) सकाळच्या सुमारास पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात बुडाले होते. अखेर अथक शोधमोहिमेनंतर सोमवारी (दि.१२) सकाळी त्यांचा मृतदेह शोधण्यात यश आले.



मिळालेल्या माहितीनुसार, दत्तू वाघमारे ढोकशेत येथील धरणात उतरले असता ते अचानक खोल पाण्यात गेले. एका लहान मुलाने त्यांना पाण्यात बुडताना पाहिले आणि तात्काळ स्थानिकांना माहिती दिली. त्यानंतर, पाली पोलीस पथक, सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेचे जिवरक्षक आणि पालीतील आपदा मित्र तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी युद्धपातळीवर व्यापक शोधमोहीम सुरू केली. ढोकशेत येथील धरणातील पाण्याची खोली अंदाजे १२० ते १३० फूट असल्याने रेस्क्यू टीमच्या जिवरक्षकांसाठी शोधकार्य अत्यंत आव्हानात्मक आणि जोखमीचे ठरत होते. प्रचंड खोली आणि नेमक्या जागेचा अंदाज न आल्याने रविवारी दिवसभरात •>पान २ वर

## 'मोदी-शहा लोकशाही संपवू शकत नाही'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडीया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची मंगळवारी (दि.१३) नवी दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर पत्रकार परिषद झाली. त्यावेळी लोकशाहीसाठी आम्ही सगळे एकत्र लढणार असल्याचे मत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केले. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही टीका केली. संविधानाचे रक्षण करणे हाच आमच्या आंदोलनाचा उद्देश असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही राहुल गांधी यांनी जोरदार टीका केली. ज्ञानेश कुमारांनी पारदर्शक निवडणुका संपवल्या

**■ राहुल गांधींकडून सरकारचा समाचार**



आहेत. आमची टीम आता थांबणार नाही. मतचोरीचा मुद्दा राजकीय नाही तर सर्वसामान्य जनतेचा आहे असेही राहुल गांधी म्हणाले. भाजपविरोधात आम्ही सगळ्यांची एकजूट आहोत. जंतर मंतरवर आता लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यास दिले जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी हे आर्किटेक्ट आहेत, तर अमित शाह आणि ज्ञानेश कुमार इम्प्लिमेंटर आहेत. तुम्ही लोकशाही संपवू शकत नाही. तुम्ही काल जे पाहिलं ते फक्त पक्षाचे नाही तर सर्वसामान्यच्या भावना होत्या. हे सगळं भारतीयांसाठी सुरु आहे, देशाच्या भविष्यासाठी करत आहोत. काल मी पत्रकार परिषद मध्ये बोललो आम्ही थांबणार नाही, आज नाही तर उद्या ही टीम एन्ड गोलपर्यंत जाणार आहे. सगळं आम्ही आता सांगणार नाही. तुम्हाला सरप्राईज •>पान २ वर

## बांधकाम सेंटरींगच्या प्लेटी भंगारात?

### अलिबाग पोलिसांचा तपास गुलदस्त्यात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमधील बांधकाम सेंटरींगच्या प्लेटी रातोरात गायब करण्यात आल्या होत्या. दरम्यान, या प्लेटी एका भंगार विक्रेत्याकडे आढळून आल्याचे बोलले जात आहे. मात्र, अलिबाग पोलिसांकडून ठोस कारवाई करण्यात आली नसून, त्यांचा तपासच अद्यापही गुलदस्त्यात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या मागील खरा सुत्रधार कोण, सवाल उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग शहरातून काही महिलांनी सेंटरींगच्या प्लेटी गायब केल्या होत्या. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकांसह हवालदारांच्या मदतीने तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान, सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. यावेळी काही महिला बांधकाम सेंटरींग प्लेटी घेऊन जात असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर या प्लेटी त्या कुठे घेऊन गेल्या, याचा शोध सुरु करण्यात आला. अखेर एका भंगारवाल्याकडे या प्लेटी असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर तपासिक विभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी भंगारवाल्याला चौकशीसाठी बोलावले. मात्र, सेंटरींग प्लेटी लंपास करणाऱ्या महिलांसह भंगार विक्रेत्यांचा तपास अद्यापर गुलदस्त्यात आहे. त्यामुळे तपासात संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. याबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्याशी •>पान २ वर

## पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

**■ धोकादायक ठिकाणी सूचना फलक; जीवरक्षक, आपदा मित्रांची घेणार मदत**

**■ पोलिसांसह होमगार्ड जवान अन् पर्यटन मित्र नियुक्त करणार**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दिवेआगर येथील समुद्रकिनारी पुण्यातील आळंदी मधील आठ विद्यार्थ्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. धोकादायक ठिकाणी सूचना फलक, जीवरक्षक, प्रशिक्षित आपदा मित्र आणि आवश्यक बचाव साहित्य उपलब्ध केले जाणार आहे.

समुद्रकिनाऱ्यांवरील बचाव यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने अलिबाग, मुरुड व श्रीवर्धन या तीन नगरपरिषदांसह नागाव, काशीद, हरिहरेश्वर आणि दिवेआगर येथील ग्रामपंचायतींना या उपकरणांचे वाटप करण्यात आले. काशीद येथे दोन उपकरणे देण्यात आली आहेत. समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांना मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी पर्यटन मित्र नियुक्त करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्याला २४० किलो मीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. अलिबाग, नागाव, वरसोली, रेवदंडा, आक्षी, मुरूड, काशीद, श्रीवर्धन व दिवेआगर अशा अनेक समुद्रकिनारी पर्यटक मोठ्या प्रमाणात •>पान २ वर

### रसायनीत अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन

**रसायनी :** रसायनीतील आळीअंबिवली येथे एका अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन केल्याची घटना घडली असून, आरोपीवर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि.१२) सुमारास येथील स्वामी समर्थ मठाजवळील अल्पवयीन मुलगी आपल्या घरी काम करीत असताना नवीन पोसरी येथील आरोपी तिच्या घरी आला. यावेळी त्याने मुलीला मारहाण करून तिच्याशी गैरवर्तन केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, या गुन्ह्यातील आरोपीला सोमवारी (दि.१२) रात्रीच्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

**अठराव्या शतकात हिंदुस्थानी मनावर अधिराज्य | अन्यायी वतनदारांवर तलवार उगारून रयतेला न्याय**

## अध्यात्माच्या पुनर्निर्माणाची दुर्गा : अहिल्याबाई होळकर

**मिलिंद मधुकर जाधव**
**श्रीवर्धन–रायगड**

ताराराणीनंतर, अठराव्या शतकात हिंदुस्थानी मनावर अधिराज्य गाजवलं ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी. ऐश्वर्यसंपन्न अहिल्याबाईंच्या समोर आलेल्या सर्व सुखांनी त्यांना सतत हुलकावणीच दिली. १७२५ साली जन्मलेल्या अहिल्याबाईंनी वयाच्या २९व्या वर्षी पती, ३५व्या वर्षी पुत्र आणि त्यानंतर सासऱ्यांच्या मृत्यूचं आभाळाएवढं दुःख पचवलं. त्यांची तलवार ही संरक्षणाची ढाल होती. पती, पुत्र आणि कर्तबगार सासऱ्यांच्या मृत्यूनंतर खचलेल्या




स्वराज्याला त्यांनी तलवारीच्या जोरावरच सावरलं. भिल्ल आणि गोंडांचं बंड मोडून काढण्याबरोबरच स्वराज्याच्या चौथाईचं रक्षण केलं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे अन्यायी वतनदारांवर तलवार उगारून रयतेला न्याय दिला. त्यांची तलवार न्यायाच्या स्थापनेसाठी म्यानाबाहेर येत होती.

१७६७ साली मध्य प्रदेशातल्या माळवा, महेश्वर आणि आसपासच्या प्रदेशाच्या राज्यकारभाराची सूत्र हाती घेताच राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडवले. त्यांनी बांधलेल्या पाणपोई यात्रेकरूंची तहान भागवत होत्या. तर त्यांनी उभारलेल्या विश्रांतीगृहांनी यात्रेकरूंवर मायेची सावली धरली. व्यापारी, विद्वान आणि कारागिरांना त्यांच्या कारकीर्दीत राजाश्रय मिळाला. अन्य प्रांत दुष्काळाचे चटके सहन करत असताना हातमाग उद्योगाला प्रोत्साहन देऊन, त्यांनी राजधानी महेश्वरला दिलेला सांस्कृतिक केंद्राचा दर्जा कौतुकाचा विषय ठरला. त्यांच्याच कारकिर्दीत नावारूपाला आलेली जगप्रसिद्ध माहेश्वरी साडी आजही समस्त महिलांच्या आवडीचा आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

मोठ्या प्रमाणात बांधलेल्या विहिरी, वृक्ष लागवड, नद्यांवर स्नानासाठी जागोजागी बांधलेले घाट, महिलांना शस्त्रास्त्र पारंगत करून लष्करात दिलेली संधी याबरोबरच सर्वात महत्त्वाचं म्हणजे औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेल्या काशी विश्वनाथ, सोमनाथ, द्वारका, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर यासारख्या कित्येक मंदिरांच्या पुनर्निर्माणाचं पवित्र कार्य करून भागवत धर्माची पताका त्यांनी सन्मानाने फडकत ठेवली. परकीय आक्रमणानंतर उद्ध्वस्त झालेली कित्येक मंदिरं आज पुन्हा ताठ मानेने उभी राहीली ती पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या पराकोटीच्या अध्यात्मिक भावनेतूनच. •>पान २ वर

# भाजपाचा अहंकार निवडणुकीत उतरवा

## हर्षवर्धन सपकाळ यांचे आवाहन

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारतीय जनता पक्ष निवडणुकीत पैशांचा वारेमाप वापर करत असून, ''पैसा फेक तमाशा देख''चा खेळ सुरु आहे. पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकता येतात हा अहंकार वाढीस लागला असून, भाजपाचा हा पैशाचा माज या विधान परिषदेच्या निवडणुकीत उतरवा. लोकशाहीत मत विकत घेता नाही हे दाखवून द्या आणि महाविकास आघाडीच्या पाचही उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. जयंत आसगावकर व हर्षदा देशमुख जाधव यांच्या प्रचारासाठी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात प्रचार मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार (ऑनलाईन), माजी मंत्री विश्वजित कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी मंत्री जयंत पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, आमदार बापुसाहेब पठारे, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, प्रभाकर देशमुख, अंकुश काकडे, पुणे शहर काँग्रेस (पूर्व) अध्यक्ष प्रशांत जगताप, पुणे शहर पश्चिम अध्यक्ष दिप्ती चवधरी आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, देशातील व्यवस्थेवर जनतेचा विश्वास राहिलेला नाही, निवडणूक आयोग आहे, त्यावरही विश्वास नाही, एमपीएससीवर तरुणांचा विश्वास राहिलेला नाही, या यंत्रणा फेल ठरल्या आहेत तर आपला देश हुकूमशाहीकडे गेलेला आहे, या परिस्थितीतून पुढचे पाऊल कसे टाकायचे हा खरा प्रश्न आहे. लोकशाही व संवैधानिक मुल्ये पायदळी तुडवली जात आहेत, या कठीण परिस्थितीत चांगले व हुशार लोकप्रतिनिधी सभागृहात गेले पाहिजेत. पदवीधर व शिक्षकांचे प्रश्न आहेत, त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या प्रतिनिधींना सभागृहात पाठवले पाहिजेत. काँग्रेस सरकार असतानाही आरएसएसच्या लोकांची कामे केली जात असे, संघाच्या अनेक शैक्षणिक संस्थांना काँग्रेस सरकारने परवानग्या दिलेल्या आहेत. महाविकास आघाडीच्या २०२४ च्या घोषणापत्रात जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आश्वासन दिले होते, मविआची सत्ता आली नसली तरीही आम्ही त्या भूमिकेवर आजही ठाम आहोत, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, देशातील वातावरण सध्या बदलले आहे, केंद्रातील व राज्यातील भाजपा सरकारमध्ये भ्रष्टाचार प्रचंड बोकाळला आहे. राज्यात मोठा दुष्काळ पडलेला असून भाजपा सरकार दुष्काळी परिस्थिती व्यवस्थित हाताळताना दिसत नाही. २०१२-१३ मध्ये काँग्रेस आघाडीचे सरकार असताना आम्ही दुष्काळ व्यवस्थित हाताळला व शेतकऱ्यांना योग्य ती मदत दिली होती. आज शिक्षण क्षेत्राचा खेळखंडोबा झाला आहे. भाजपा सरकार विकसीत भारताचे स्वप्न दाखवत आहे पण सध्या एआयचा जमाना आहे, सरकारने कितीही जाहिरातबाजी केली तरी ते दिवास्वप्नच आहे.

आपण बौद्धिक कौशल्यावरच प्रगती करू शकू आणि त्यासाठी शिक्षण संस्था सुदृढ झाल्या पाहिजेत. भाजपा सरकार विरोधात देशातील युवा पिढी व जनता रस्त्यावर आली आहे. भाजपा सरकारचे खरे स्वरुप समोर आलेले आहे पण भ्रमात राहू नका, शेवटपर्यंत काम करा, मतदारांना मतदानासाठी बाहेर काढा. जिद्दीने काम केले तर मविआचे दोन्ही उमेदवार निवडून येतील असा विश्वास पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

# सहाय्यक आयुक्तांच्या निलंबनाची मागणी

**पनवेल :** कामोठे सेक्टर १८ मधील हॉटेलांवर करण्यात आलेल्या अतिक्रमण कारवाईवरून व्यापारी वर्गात नाराजी पसरली आहे. या कारवाईप्रकरणी पनवेल महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांच्यावर कारवाई करून त्यांचे निलंबन करावे, अशी मागणी प्रहार संघटनेने केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे आणि महापौर नितीन पाटील यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले.

प्रहार संघटनेच्या म्हणण्यानुसार, कामोठे सेक्टर १८ मधील स्वादिष्ट हॉटेल, अश्विता हॉटेल यांसह अन्य हॉटेलांवर कोणतीही लेखी नोटीस न देता तोडक कारवाई करण्यात आली. संबंधित हॉटेलांच्या शेडसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत पालिकेची परवानगी असतानाही कारवाई केल्याने व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या कारवाईदरम्यान कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी गैरवर्तन केल्याचाही आरोप करण्यात आला. कारवाईचा लेखी आदेश मागितल्यानंतरही समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित नसताना कारवाई कोणाच्या आदेशावरून करण्यात आली, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. या प्रकरणाची आयुक्त आणि महापौरांनी दखल घ्यावी, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली. चर्चेदरम्यान रूपाली माने यांच्याकडील अतिक्रमण विभागाचा कार्यभार काढून घेण्यात येईल आणि त्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्याची माहिती प्रहार संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिली. या वेळी ॲड. अजय तापकीर, संपर्कप्रमुख अजय कदम यांच्यासह हॉटेल व्यावसायिक आणि मालक उपस्थित होते.

# वेतनवाढीसाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

राज्यातील महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाअंतर्गत कार्यरत असलेल्या हजारो सुरक्षा रक्षकांच्या वेतनात समाधानकारक वाढ करावी, तसेच वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर महागाई भत्ता व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात युनियनने मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे.

महाराष्ट्रातील विविध शासकीय, निमशासकीय, औद्योगिक तसेच महत्त्वाच्या आस्थापनांमध्ये हजारो सुरक्षा रक्षक अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. ऊन, पाऊस आणि प्रतिकूल हवामानाची पर्वा न करता नागरिकांची सुरक्षा, शासकीय मालमत्तेचे संरक्षण आणि विविध आस्थापनांमधील सुरक्षितता राखण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी ते पार पाडतात. मात्र, वाढती महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या दरात होणारी वाढ यामुळे या कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे युनियनने निवेदनात नमूद केले आहे. घरभाडे, किराणा, वैद्यकीय उपचार, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन खर्च भागविताना सुरक्षा रक्षकांच्या कुटुंबांची आर्थिक ओढाताण होत आहे. सध्याचे वेतन आणि भत्ते वाढत्या जीवनावश्यक खर्चाच्या तुलनेत अपुरे पडत असल्याने शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे युनियनने म्हटले आहे. सुरक्षा रक्षकांच्या वेतनात लक्षणीय वाढ करण्याबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच वाढत्या महागाईशी सुसंगत महागाई भत्ता आणि आवश्यक सोयी-सुविधा लागू कराव्यात, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हजारो सुरक्षा रक्षक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून शासनाने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही युनियनने व्यक्त केली आहे.

युनियनचे संस्थापक-अध्यक्ष संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हाध्यक्ष मंगेश लक्ष्मण पाटील, उपाध्यक्ष विलास मधुकर मोरे, रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक चंद्रकांत गांधी आणि रायगड जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण) सुनील विजय भोईर यांच्यावतीने हे निवेदन देण्यात आले आहे.

# टॉवरवर चढलेल्या व्यक्तिला सुखरूप उतरविले

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी परिसरात टॉवरवर चढलेल्या सुबोध करण सिंग (३३) या व्यक्तिला पोलिसांनी यशस्वीरीत्या सुखरूप खाली उतरविल्यानंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. प्राथमिक माहितीनुसार, सुबोध सिंग यांनी मोबाईल हॅक झाल्याचा आणि आपल्या बँक खात्यातून सुमारे ३ लाख रुपये काढून घेतल्याचा संशय व्यक्त केला होता. संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पैसे परत मिळावेत, या मागणीसाठी ते टॉवरवर चढले होते. मात्र, रसायनी पोलिसांनी अधिक तपास केला असता, सुबोध सिंग यांचा मोबाईल हॅक झाल्याचे आढळून आले नाही. तसेच, त्यांच्या बँक खात्यातून पैसे गेल्याचा प्रकारही तपासात निष्पन्न झाला नसल्याची माहिती समोर आली आहे. सुबोध सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार पैसे काढून



घेतल्याचा प्रकार तपासात आढळून न आल्याने, त्यांनी टॉवरवर चढण्यामागे अन्य काही कारण होते का, या दिशेने पोलिसांकडून चौकशी केली जात असल्याचे समजते. या प्रकरणाचा संबंध लोहोप हद्दीतील बाबा कंटेनर कंपनीशी असल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, या घटनेमागील नेमके कारण आणि संबंधित बाबींचा उलगडा पुढील पोलीस तपासानंतरच होणार आहे.

## बांधकामाच्या ठिकाणाहून
# मोबाईल चोरी

**पनवेल :** पनवेल परिसरातील वरचे ओवळे, सेक्टर १ येथील इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी झालेल्या मोबाईल चोरीप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी जगदीश गुरुनाथ वाघे (३५) याला अटक केली आहे. या कारवाईत तीन गुन्हे उघडकीस आले असून, आरोपीकडून मोबाईल आणि दुचाकी असा एकूण ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान प्लॉट क्रमांक २४९ समोरील बांधकामाच्या ठिकाणी ही चोरी झाली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सीआरपी कमल रमाकांत जाधव यांच्या आंबिवली येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला.



ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमामागील उद्देश होता. या शिबिरामध्ये नागरिकांची रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. तसेच पोटाचे व पचनसंस्थेचे विकार, श्वसनविकार, सर्दी, खोकला आणि ताप यासंबंधी तपासणी व चाचण्या करण्यात आल्या. डॉक्टरांकडून नागरिकांना आरोग्यविषयक सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले. आजारानुसार आवश्यक औषधांचे निःशुल्क वितरणही करण्यात आले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत माजगावच्या सरपंच दीपाली नरेश पाटील, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, महिला बचतगटांच्या अध्यक्ष, सचिव, सदस्यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

पान १ वरुन

## १३९ कोटींची उधारी

विभागाकडून जिल्हा परिषदेला पत्र देण्यात आले आहे. १३९ कोटी रुपयांचे पाण्याची थकबाकी शिल्लक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना २५ ऑगस्ट रोजी पत्र देण्यात आले आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या उदासीनतेमुळे गावे, वाड्यांमधील पाणी पुरवठा खंडीत होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे.

## 'मोदी-शहा लोकशाही संपवू शकत नाही'

केले जाणार आहे. आम्ही सगळे मिळून लढत राहणार आहोत. आम्ही न्यायलाय सरन्यायधीश यांचा आदर करतो ते त्यांचा रोल प्ले करतील असेही राहुल गांधी म्हणाले. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडीया आघाडीचे नवी दिल्लीत आंदोलन सुरु आहे. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

## बांधकाम सेंटरींगच्या प्लेटी भंगारात?

संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, सेंटरींग प्लेटी चोरणाऱ्या महिलांचा शोध सुरु असल्यामुळे भंगार विक्रेत्यांविरोधात कारवाई करून शकत नाही. त्यामुळे तपास विभागाने नक्की कशासाठी कारवाईची हालचाल सुरु केली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## अध्यात्माच्या पुनर्निर्माणाची दुर्गा : अहिल्याबाई होळकर

लोककल्याणाची तळमळ, धर्मकार्यावरील अचल निष्ठा आणि भारतीय सांस्कृतीक वारशाच्या पुनरुज्जीवनासाठी केलेली अखंड साधना, यामुळे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं नाव हिंदुस्थानच्या हृदयसिंहासनावर कायम राहील.काशीपासून रामेश्वरपर्यंतच्या मंदिरांचे गाभारे पुनर्निर्माणाच्या सात्विक प्रकाशाने उजळवणाऱ्या अध्यात्माच्या पुनर्निर्माणाची दुर्गा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या चरणी नवरात्रीची चौथी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.

## महिलेला पतीकडून अमानूष मारहाण

कळंब आऊट पोस्ट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर हे प्रकरण सामंजसपणे दाखवून दोघांनी कौटुंबिक वाद पोलीस ठाण्यातच मिटवला. परंतु, त्यानंतर देखील वारंवार चारित्र्यावरून शिवीगाळ करून मारहाण केल्याच्या घटना घडल्या. त्यातच दि.५ ऑक्टोबर रोजी रोजी मध्यरात्री ललिता ऐनकर या आपल्या घरामध्ये झोपल्या असता, पती एकनाथ ऐनकर यांनी दरवाजा वाजवला. मात्र, त्यांच्याकडून दरवाजा उघडण्यास वेळ लागला. त्याबाबत आपल्या पत्नीला काहीही न विचारता थेट तिच्या चारित्र्यावरून संशय घेत शिविगाळ करून लाकडी दांडक्याने डोक्याच्या मागीलच्या बाजूला मारले. त्यानंतर उजव्या पायाच्या पोटरीजवळ व गुडघ्याजवळ तसेच उजव्या हाताच्या कोपराजवळ दांडक्याने मारहाण केली. त्याचबरोबर तोंडावर व उजव्या डोळ्यावर हाताने दुखापत करण्यात आली. त्यामुळे लिलिता यांच्या डोक्यात मारल्याने गंभीर दुखापत झाली असून, ५४ टाके पडले आहेत. तसेच, पाय देखील फ्रॅक्चर झाला आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## युपीआय पेमेंट करणाऱ्यांना दिलासा

प्रमाण वाढते. अशा वेळी व्यापाऱ्यांच्या डिजिटल व्यवहारांवरील खर्चात वाढ होऊ नये, अशी मागणी व्यापारी संघटनांकडून करण्यात आली होती. शुल्काची अंमलबजावणी पुढे ढकलल्यामुळे बँका, पेमेंट ॲग्रीगेटर्स आणि डिजिटल पेमेंट कंपन्यांना आवश्यक तांत्रिक बदलांसाठी अधिक वेळ मिळणार आहे. या नव्या तारखेची घोषणा झाल्यावर व्यापाऱ्यांच्या पात्र व्यवहारांवर शुल्क कधीपासून आकारले जाईल, हे स्पष्ट होईल.

## ढोकशेत धरणात बुडून मृत्यू

यश आले नव्हते. मात्र, प्रशासकीय यंत्रणा आणि जिवरक्षकांनी हार न मानता सोमवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम तीव्र केली असता अखेर वाघमारे यांचा मृतदेह हस्तगत करण्यात आला.दरम्यान, सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेने गेल्या पाच महिन्यांपासून रायगड जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर फाटक यांच्याकडे 'अंडरवॉटर ड्रोन' हे उपकरण उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाकडून आश्वासने मिळाली असली तरी प्रत्यक्षात अजून ड्रोन मिळालेला नाही. त्यामुळे या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने त्वरित 'अंडरवॉटर ड्रोन' उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी रेस्क्यू टीम व नागरिकांकडून केली जात आहे.

## पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

फिरण्यास जातात. अलिबागसह काशीद, नागाव, दिवेआगर, श्रीवर्धन व मुरूड या समुद्रकिनाऱ्यांना पर्यटकांकडून पसंती दर्शविली जात आहे. या पर्यटन स्थळी पर्यटकांची अलोट गर्दी होते. जिल्ह्यात वर्षाला १० लाखहून अधिक पर्यटक फिरण्यासाठी येतात. मागील महिन्यात पुणे येथून फिरण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थ्यांचा समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेनंतर जिल्हयातील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाकडून कडक पावले उचलण्यात आली आहेत. वारंवार घडणाऱ्या दुर्घटनांची दखल घेत समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रोबोटीक बोया आणि अत्याधुनिक सुरक्षा साधन तैनात केली जाणार आहे.

समुद्रकिनाऱ्यांवरील बचाव यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने अलिबाग, मुरुड व श्रीवर्धन या तीन नगरपरिषदांसह नागाव, काशीद, हरिहरेश्वर आणि दिवेआगर येथील ग्रामपंचायतींना या उपकरणांचे वाटप करण्यात आले. काशीद येथे दोन उपकरणे देण्यात आली आहेत. समुद्रकिनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन आधुनिक बचाव उपकरणांचा वापर, प्रशिक्षित जीवरक्षकांची उपलब्धता आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पोलीस व होमगार्डची गस्त वाढविली जाणार आहे. धोकादायक ठिकाणांचे सर्वेक्षण करून तेथे स्पष्ट सूचना फलक लावले जाणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळण्यासाठी आपदा मित्रांची मदत घेणे. त्यांना पोहण्याचे प्रशिक्षण द्यावे आणि आवश्यक बचाव साहित्य उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिल्ह्यात एकूण ३१ समुद्रकिनारे असून, त्यापैकी २८ किनारे सुरू असून ११ समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी गर्दी होते. या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेला विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यात पर्यटन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी सहायक जिल्हा पर्यटन अधिकारी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार आहे. समुद्रकिनाऱ्यांवरील संभाव्य अपघात टाळण्यासाठी धोकादायक ठिकाणांची ओळख करून तेथे आवश्यक सूचना फलक लावले जाणार आहेत. गर्दीच्या समुद्रकिनाऱ्यांवर पोलीस आणि होमगार्डची गस्त वाढवून पर्यटकांच्या हालचालींवर लक्ष ठेवली जाणार आहे.


### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात त्यातील सर्व हक्कांसमवेत, प्रद्युम्न प्रोजेक्ट रियल्टी टू एलएलपी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता ४२ए, इम्प्रेशन हाऊस, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई, मुंबई - ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणीही व्यक्ती वा संस्था यांचा सदर मालमत्ता व/वा कोणतेही भार व/वा कोणत्याही स्वरूपातील अधिकारिता यांसंदर्भात विक्री, अभिहस्तांकन, अभिहस्तांतरण, हस्तांतरण, विभाजन, विमोचन, परित्याग, गहाण, प्रभार, दावा, भेट, कुटुंब व्यवस्था, सामंजस्य करार, भागीदारी, हमी, सुविधाधिकार (हक्क मार्गासह), कर्जे, आगाऊ रकमा, न्यास, हक्क दस्तावेजांची ठेव, विकासहक्क, एफएसआय उपभोग, मृत्यूपश्चात वारसा, वहिवाट, उप-वहिवाट, उत्तराधिकार, भाडेकरार, धारणाधिकार, व्यवस्था, लाभ हितसंबंधात व/वा अन्य कोणतीही जप्ती, पर्याय करार, चिह्नांकन, निषेधाज्ञा वा कोणत्याही स्वरूपातील विचाराधीन विवाद वा कोणत्याही स्वरूपातील कोणतेही करार (लिखित वा मौखिक) वा अन्य कोणतेही वा कोणतेही संयुक्त उद्यम करार वा कोणतीही जप्ती, वा कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर कोणतेही निवाडा आदेश वा हुकूम, पूर्व क्रय वा जुना वहिवाट हक्क वा भार कोणत्याही स्वरूपातील वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हक्क, अधिकार, लाभ, मागणी, हितसंबंधत व/वा कोणत्याही स्वरूपातील प्रभार वा खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागावरील कायद्याच्या कार्यचलनाअंतर्गत वा अन्य कोणत्याही स्वरूपातील कोणताही दावा असल्यास यामध्ये तिचा विकास हक्क, टीडीआर/एफएसआय व/वा मालमत्तेअंतर्गत उद्भवलेला संभाव्य विकास हक्क यांचाही समावेश असेल असे असल्यास त्यांनी त्यासंदर्भात पुराव्यासहित लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असे कथित दावे, हितसंबंध, भार वा मागणी काही असल्यास ती सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**

पुढील विवरणीत बिगर शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित अंदाजे ६७.९७.०० ए चौ. मी. वा जवळपास (७/१२ उताऱ्यानुसार) व ५८७७ चौ.मी. वा जवळ पास (प्रत्यक्ष ताब्यानुसार), गट क्र.५२/१/२/१/७, गाव झिरडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड महाराष्ट्र येथील यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :

**प्रथमत :**
पुढील विवरणीत बिगरशेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - जमीन मोजमापित अंदाजे ४००७ चा. मी. वा जवळपास (प्रत्यक्ष ताब्यानुसार), गट क्र. ५२/१/२/१/७ चा भाग बनत असलेला, गाव झिरडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील व सीमा पुढीलप्रमाणे -

**उत्तरेस :** गट क्र. ५२/१/२/१/६ धारक जमीन व गट क्र.गट क्र. ५२/१/२/१/७ धारक जमिनीचा भाग.
**दक्षिणेस :** गट क्र.. ५१ धारक जमीन.
**पूर्वेस :** गट क्र. ५२/१/२/२ धारक जमीन
**पश्चिमेस :** गट क्र. ५२/१/१ धारक जमीन.

**द्वितीयत :**
मोजमापित १८६९ चौ. मी. (प्रत्यक्ष ताब्यानुसार) धारक जमिनीच्या भूखंडाचा ९ मीटर रुंद प्रवेश, गट क्र. ५२/१/२/१/७ धारक मोजमापित अंदाजे ६७.९७.०० चौ. मी. वा जवळपास (७/१२ उताऱ्यानुसार) क्षेत्रफळाच्या जमिनीचा भाग बनत असलेला.

दिनांक - १४.१०.२०२६

**अधीराज हरीश**
डीएम. हरीश ॲन्ड कं.एलएलपी
वकील
३०५-३०९, नीलकंठ,
९८, मरीन ड्राइव्ह,
मुंबई - ४०० ००२.
notice@dhharish.com



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशिलांनी मौजे यशवंतखार, ता. रोहा येथील १. श्री. संतोष गणपत कोळी, २. श्री. प्रकाश मनोहर दिवकर, रा.मु. यशवंतखार, पो. सानेगाव, ता. रोहा, जि.रायगड यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| यशवंतखार, ता. रोहा, जि. रायगड | ९४ | क्षेत्र ०-५९-७० पो. ख. ०-०१-५० एकूण ०-६१-२० | ८.५६ |

वरील मिळकतीचे एकूण ०-६१-२० हे. आर. इतके क्षेत्र

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वाहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागवून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :-रोहा
दिनांक :- १३/१०/२०२६

सही/-
**ॲड. नितेश पांडुरंग ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०
(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस,
ए-२०३, वसंतपुष्प को. ऑप. हौ.सो. लि., अलिबाग-रायगड)



### पनवेल महानगरपालिका
### पर्यावरण विभाग

'पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता प्रायोगिक तत्वावर STR-101 Filterless Dust & Smoke Capturing Device स्थापित करणेबाबत'' याकामाकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता जाहीर सूचनेद्वारे नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची माहिती panvel-corporation.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र/पमपा/पर्या./२८२६/प्र.क्र.२०/१५०/२०२६
दिनांक :-१३/१०/२०२६

**(स्वाक्षरीत/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**



### टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळवण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत पैकी मौजे भालिवडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, तलाठी सजा भालिवडी, यांसी हद्दीतील शेती जमीन मिळकत, यांसी सर्व्हे नं. ५९/१/क यांसी एकूण क्षेत्र ० हे. ४५ आर ५० चौ.मी. यांसी आकार रु. ३.०७ व त्यावर केलेले बांधकाम दगड, विटा, सिमेंट पत्रा ज्याचे क्षेत्र २४९१ चौरस फुट मात्र.

वरील नमूद ० हे. ४५ आर ५० क्षेत्राची शेती जमीन मिळकत ही १) मे. डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार गुरुराज मल्लिकार्जुन सिदमल, २) मे. डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार दर्शिका योगेश सिंह कोटीया, ३) मे, डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार नरेंद्र उमेश झुराणी, ४) मे. डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार योगेश सिंह कोठीया, ५) मे. डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार सुश्मिता नरेंद्र झुराणी, ६) मे. डेसीटेरा डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार सुषमा गुरूराज सिदमल यांच्या मालकी हक्कातील मिळकत असून, सदर मिळकतीच्या निर्वेधपणाची व मालकी हक्काची खात्री करणेकरीता प्रस्तुतची टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही तऱ्हेने मालकी हक्क, हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, लायसन्स, लियन, अन्नवस्त्र, कोर्टवाद, कर्जबोजा, जप्ती, अटॅचमेंट, करार, ताबा, वारसाहक्क, हक्कसोड, दावा, हरकत, अधिग्रहणाची कार्यवाही किंवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या ऑफिसमध्ये येऊन त्यासंबंधीच्या साक्षांकित दस्तऐवजांसह लेखी हरकत घ्यावी.

अन्यथा, सदर मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित व तबदील करण्यास योग्य आहे, असे समजण्यात येईल. तसेच सदर मुदतीनंतर येणाऱ्या अथवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या हरकती तसेच संबंधित कागदपत्रांशिवाय घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. ही टायटल व्हेरिफिकेशनची जाहीर नोटीस.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक : १४/१०/२०२६



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतीचे (सदर मिळकत) विद्यमान मालक श्री. भगवान नामदेव पाटील ऊर्फ भगवान नामदेव घोडे यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रीया चालु केली आहे. माझे अशिलांनी विद्यमान मालकांकडुन सदर मिळकत खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती मिळकतीचे वर्णन**

| अ क्र. | भूमापन व उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १ | १२३/१ | ००-६६-१० | १.९३ |
| २ | १२६/६ | ००-०८-९० | १.२५ |
| ३ | १२७/१ | ००-३९-५० | ३.६३ |
| ४ | १२७/२ | ००-१९-७० | ३.३७ |
| ५ | १२७/३ | ००-१०-६० | ००.२२ |
| ६ | १२८/१ | ००-५९-७० | ८.६९ |
| ७ | १२८/२ | ००-११-४० | ००.३९ |
| ८ | १२९ | ००-१२-०० | ०.१९ |
| ९ | १३० | ००-६७-८० | ६.४४ |
| १० | १३१/१ | ००-४७-०० | ०.८६ |
| ११ | १३३/१ | ०१-७६-०० | २८.१२ |
| १२ | १३७/७ | ००-०१-०० | ००.०२ |
| १३ | १३७/३/अ/१ | ०१-७५-०० पैकी ०१-५९-०० | ३.१९ पैकी २.८९ |
| १४ | १३७/३/अ/६ | ००-२०-०० | ००.५० |
| १५ | १३७/३/अ/७ | ०१-८९-०० | ३.१९ |
| १६ | १३७/३/ब/२ | ०३-१७-०० | ५.०८ |
| १७ | १३७/४ | ००-०१-०० | ०.०२ |
| १८ | १३७/६ | ००-०२-०० | ०.०५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा कंपनीचा, मर्यादित दायित्व भागिदारी संस्था, भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बँकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार, करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत, ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतीसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १३/१०/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा',
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.
अलिबाग, जि. रायगड.

# निवडक

## पनवेल-कर्जत रेल्वे मार्गाचे काम अंतिम टप्प्यात



**खांदा कॉलनी :** पनवेल-कर्जत दुहेरी उपनगरीय रेल्वे मार्गाचे काम अंतिम टप्प्याकडे जात असल्याने पनवेलकरांच्या आशा पुन्हा उंचावल्या आहेत. पनवेल रेल्वे स्थानक परिसरात या मार्गासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांना वेग आला असून, रेल्वे कर्मचारी आणि कामगारांकडून युद्धपातळीवर काम सुरू आहे. पनवेल स्थानकात नव्या रेल्वे मार्गासाठी स्वतंत्र प्लॅटफॉर्म उभारण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्मवरील विविध सुविधा, रेल्वे रुळांची कामे, सिग्नल यंत्रणा तसेच इतर तांत्रिक कामे पूर्ण करण्यासाठी कर्मचारी दिवसरात्र मेहनत घेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग सुरू झाल्यानंतर पनवेल, नवीन पनवेल, नेरे, चिखली परिसरासह कर्जतच्या दिशेने प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या या मार्गावर रस्ते वाहतुकीवर अवलंबून असलेल्या प्रवाशांना रेल्वेचा पर्याय उपलब्ध होणार असल्याने प्रवासाचा वेळ आणि वाहतुकीचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. पनवेल हे नवी मुंबई आणि रायगड परिसरातील महत्त्वाचे रेल्वे केंद्र आहे. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांसाठी पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे सेवा सुरू झाल्यास या परिसरातील दळणवळणाला आणखी चालना मिळणार आहे. या रेल्वे मार्गामुळे पनवेल आणि कर्जत परिसरातील अनेक गावांना उपनगरीय रेल्वे सेवेचा थेट फायदा मिळणार आहे.

## कार बाजूला काढण्यावरून मारहाण

**नवीन पनवेल :** हॉटेलच्या समोर लावलेली कार बाजूला काढण्यावरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. या प्रकरणी चौघाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी संतोष गोरखनाथ गिरी हे कामोठे येथे राहत असून त्यांचे ओएनजीसीच्या बाजूला हॉटेल आहे. या हॉटेलच्या समोर कोणीतरी त्यांची कार पार्क करून ठेवली होती. ही कार बाजूला काढण्यावरून त्यांच्यात वाद झाला. यावेळी रोशन घरत, श्रीकांत उर्फ श्री घरत, हितेश घरत आणि मुकेश रौनथ यांनी संतोष गिरी यांच्या हॉटेलमध्ये घुसून त्यांना मारहाण करण्याची धमकी दिली आणि हेल्मेट व लाकडी दांडका व हाताचापट्याने मारहाण केली, यात संतोष गिरी जखमी झाले.

## पाथरशेत आदिवासीवाडीतून मुलगी बेपत्ता

**कोलाड :** रोहा तालुक्यातील पाथरशेत आदिवासीवाडी येथून एक अल्पवयीन मुलगी अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अल्पवयीन मुलगी घरातून कोणालाही काही एक न सांगता निघून गेलेल्या या अल्पवयीन मुलीचा सर्वत्र शोध घेऊनही ती मिळून न आल्याने, अखेर अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रोहा तालुक्यातील पाथरशेत आदिवाशीवाडी, पो. जामगांव येथील अल्पवयीन मुलगी शुक्रवारी (दि.९) रोजी यांची मुलगी वय १४ वर्षे ३ महिने २७ दिवस फिर्यादी यांच्या राहत्या घरातून मौजे पाथरशेत आदिवासीवाडीतून कोणास काही न सांगता घरातून अचानक निघून गेली. तिचा आजूबाजूच्या परिसरात तसेच नातेवाईक व मित्रांकडे शोध घेतला असता ती आजपर्यंत मिळून न आल्याने यांनी कोलाड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.याबाबत कोलाड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील सखोल तपास कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत फार्णे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हवालदार वैशाली वारगुडे या करीत आहेत.

## इमविरोटेक प्रा. लि. कंपनीत चोरी

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चावणे गाव परिसरात असलेल्या रिटेक इमविरोटेक प्रा. लि. कंपनीतून १२ हजार रुपये किमतीच्या ताब्यांच्या प्लेट चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, (दि.२७) ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १० वाजल्यापासून २८ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १० वाजेपर्यंतच्या कालावधीत मौजे चावणे येथील रिटेक इमविरोटेक प्रा. लि. कंपनीच्या हद्दीत ही चोरी झाली. अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय, स्वतःच्या फायद्याच्या उद्देशाने कंपनीतील एकूण १२ हजार रुपये किमतीच्या ताब्यांच्या प्लेट चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चोरीच्या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत. चोरीचा माल आणि संबंधित आरोपीचा शोध घेण्याच्या दृष्टीने पोलिसांचा तपास सुरू आहे.

# वीज खांबावरील तारांना आग

- पनवेल अग्निशमन दलाचा फोन बंद
- आपत्कालीन सेवेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरात रात्रीच्या वेळी वीज खांबावरील तारांना सोमवारी अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती देण्यासाठी नागरिकांनी पनवेल अग्निशमन दलाच्या २७४६१५०० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा क्रमांक बंद असल्याचे आढळल्याने आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवण्यासाठी नागरिकांची धावपळ उडाली. या घटनेमुळे अग्निशमन विभागाच्या संपर्क यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वीज खांबावरील तारांना आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला माहिती देण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार संपर्क साधूनही दूरध्वनी क्रमांक लागत नसल्याने नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अखेर नागरिकांनी पोलिसांच्या १०० क्रमांकावर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी नवीन पनवेल अग्निशमन केंद्राला कळविले. दरम्यान, अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच विद्युत कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली. त्यामुळे संभाव्य धोका टळला.





### मदत कशी मिळणार?

आगीसारखी दुर्घटना घडल्यास प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. अशा वेळी अग्निशमन दलाचा दूरध्वनी क्रमांकच बंद असेल, तर नागरिकांनी मदतीसाठी कुणाकडे धाव घ्यायची, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. सुदैवाने या घटनेत विद्युत कर्मचाऱ्यांनी वेळेत आग नियंत्रणात आणली; मात्र दुसऱ्या एखाद्या गंभीर दुर्घटनेच्या वेळी संपर्क यंत्रणा बंद असल्यास मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने आपत्कालीन दूरध्वनी क्रमांकाची तातडीने तपासणी करून तो चोवीस तास कार्यरत राहील, याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, मुख्य क्रमांक बंद पडल्यास नागरिकांना त्वरित मदत मिळावी यासाठी पर्यायी संपर्क क्रमांक प्रसिद्ध करणेही गरजेचे आहे.

आपत्कालीन सेवांमधील अशा त्रुटींकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अग्निशमन दलाचा संपर्क क्रमांक बंद का होता, त्याची दुरुस्ती कधी केली जाणार आणि भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी कोणती उपाययोजना केली जाणार, याबाबत महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# खोपोली एक्झिटजवळ अपघात; चालक जखमी

- ट्रेलरची कठड्याला जोरदार धडक
- एक्स्प्रेस वेवरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत

**| खोपोली | प्रतिनिधी |**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खोपोली एक्झिटजवळ सोमवारी सकाळी ट्रेलर कठड्याला धडकून खोल दरीत कोसळल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ट्रेलरचालक कृष्णा जायभाय (रा. कळंबोली, पनवेल) गंभीर जखमी झाले. अपघातानंतर केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा आणि हेल्प फाऊंडेशनच्या सदस्यांनी प्रयत्नपूर्वक बाहेर काढले.

ट्रेलर क्रमांक MH 46 BU 8749 हा माल घेऊन विशाखापट्टणम येथून पेणच्या दिशेने जात होता. खोपोली एक्झिटजवळ आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रेलरने महामार्गावरील कठड्याला जोरदार धडक देऊन तो खोल दरीत कोसळला. या अपघातात ट्रेलरच्या केबिनचे नुकसान झाले. चालक आत अडकून गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबीची बचाव यंत्रणा आणि हेल्प फाऊंडेशनचे सदस्य तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे प्रथम खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारांसाठी त्याला एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले.

या अपघातामुळे एक्स्प्रेस वेवरील प्रवासाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# वाहतूक कोंडीमुळे पनवेलकर हैराण

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

ऐन सणासुदीच्या काळात पनवेल शहरातील रस्त्यांवर निर्माण होणाऱ्या भीषण कोंडीमुळे पनवेलकर हैराण झाले आहेत. त्यातच काही बेशिस्त वाहनचालक नियम धाब्यावर बसवून थेट विरुद्ध दिशेने वाहने चालवत असल्यामुळे कोंडीत अधिक भर पडत आहे.

सण-उत्सवाच्या काळात तालुक्यातील अनेक नागरिक खरेदीसाठी पनवेल शहरात येतात. त्यामुळे येथे मोठी गर्दी होती. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी हे सण म्हणजे पनवेल शहरातील नागरिकांसाठी कोंडीचे दिवस ठरत आहे.

पनवेल शहरात बाहेरून येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. याशिवाय शहरातसुध्दा मोठी लोकवस्ती आहे. या कारणाने येथे रहदारी जास्त आहे. महापालिकेकडूनही या काळात अतिक्रमणविरोधी पथकाची कारवाई केली जात असली तरीही या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळाविताना वाहतूक पोलिसांची दमछाक होताना दिसत आहे. काही ठिकाणी रस्ते बंद करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी बॅरिगेड लावले होते. परंतु, तिथे कोणीही पोलीस कर्मचारी नसल्यामुळे ते बाजूला करून चालक वाहन पुढे नेत असल्याचे चित्र दिसून येत होते.

## करंजाडे ते पनवेल प्रवास ठरतोय डोकेदुखी

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल ते करंजाडे मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या भीषण स्वरूप धारण करत आहे. केवळ पाच मिनिटांच्या प्रवासासाठी सुमारे दीड ते दोन तासांचा वेळ लागत असल्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे हजारो प्रवाशांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात वाहनांची संख्यादेखील झपाट्याने वाढल्यामुळे गाढी नदीवरील पुलावर रोज वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे केवळ दोन ते साडेतीन किलोमीटरच्या अंतराला तब्बल दीड ते दोन तास लागत आहे.

# रानभाज्यांमुळे आदिवासी कुटुंबांना रोजगार

## नेरळ बाजार पेठ रानभाज्यांनी फुलली

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आदिवासी महिला या डोंगरातील रानभाज्या आणि आपल्या घराच्या आवारात बनवलेल्या रानभाज्या या बाजारात घेऊन येत आहे. कर्जत आणि नेरळ येथील बाजार पेठेत आदिवासी लोक थेट बाजारात रानभाज्यांचा व्यवसाय करू लागल्या आहेत. रानभाज्या आणि पारंपरिक शेतीचा आधार मिळू लागला असून आदिवासी कुटुंबांना रोजगार मिळत आहे.



तालुक्यातील अनेक आदिवासी बांधव आपल्या घराच्या परिसरात तसेच उपलब्ध असलेल्या छोट्या-मोठ्या शेतजमिनीत विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड करतात. याशिवाय शेताच्या बांधावर तसेच मोकळ्या जागेत नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या रानभाज्या गोळा करून त्या विक्रीसाठी कर्जत बाजारपेठेत आणल्या जातात.

कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी तसेच अतिरिक्त उत्पादन बाजारात विकून रोख उत्पन्न मिळते. जंगलातील उपलब्ध साधनसंपत्तीचा पारंपरिक पद्धतीने उपयोग करताना त्यातून अन्न, रोजगार आणि उत्पन्न मिळविण्याची पद्धत आजही अनेक कुटुंबांनी जपली आहे. स्थानिक शेतमालाला बाजारपेठ, पारंपरिक रानभाज्यांना योग्य मूल्य आणि आदिवासी बांधवांच्या मेहनतीला योग्य मोबदला मिळाला, तर त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला निश्चितच अधिक बळ मिळू शकते.

# न्हावाशेवा रेल्वे स्टेशनवर प्रवाशांची गैरसोय

- पूर्वेकडे तिकीट खिडकी नसल्यामुळे प्रवाशांचा मनस्ताप
- प्रशासनाकडे निवेदने देऊनही समस्येकडे दुर्लक्ष

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

सिडको आणि रेल्वे प्रशासनाच्या महत्त्वाकांक्षी उरण-नेरुळ/बेलापूर रेल्वे मार्गावरील न्हावाशेवा रेल्वे स्टेशनवर पूर्व बाजूला तिकीट खिडकी उपलब्ध नसल्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्थानकाच्या पूर्व परिसरातील नागरिकांना रेल्वे तिकीट काढण्यासाठी स्टेशनच्या लांब पल्ल्यावरून पश्चिम बाजूला जावे लागत असल्याने प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



> न्हावा शेवा स्टेशनच्या पूर्व बाजूला रहिवासी वसाहती मोठ्या प्रमाणावर आहेत. येथून शेकडो प्रवासी रोज मुंबई आणि ठाण्याच्या दिशेने प्रवास करतात. मात्र, पूर्व बाजूला तिकीट खिडकी नसल्यामुळे आम्हाला साधे तिकीट काढण्यासाठी स्टेशनला पूर्ण वळसा घालून पश्चिम बाजूला जावे लागते. प्रशासनाने तातडीने पूर्व बाजूला तिकीट खिडकी किंवा ऑटोमॅटिक तिकीट व्हेंडिंग मशिन सुरू करावी.
>
> -विकास पाटील, स्थानिक प्रवासी

> सकाळच्या वेळी ऑफिसला जाताना वेळेची खूप घाई असते. पूर्व बाजूने स्टेशनवर आल्यावर लक्षात येते की तिकीट काढायला पुन्हा पश्चिम बाजूला जावे लागेल, तेव्हा धावपळ उडते. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची ही साधी पण महत्त्वाची अडचण लवकरात लवकर सोडवावी.
>
> -प्रियांका म्हात्रे, चाकरमानी प्रवासी

लोकल सेवा सुरू झाल्यापासून प्रवाशांच्या प्रवासात मोठी सुलभता आली आहे; परंतु नियोजनातील त्रुटींमुळे प्रवाशांच्या समस्या अजूनही संपलेल्या नाहीत. न्हावा शेवा रेल्वे स्थानकाला पूर्व आणि पश्चिम असे दोन्ही बाजूंना परिसर जोडला गेला आहे. मात्र, तिकीट खिडकी केवळ पश्चिम बाजूलाच उपलब्ध करून देण्यात आली आहे. परिणामी, पूर्व भागातून येणाऱ्या चाकरमानी, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे तिकीट किंवा पास काढण्यासाठी किंवा प्लॅटफॉर्म बदलण्यासाठी रेल्वे पादचारी पुलावरून लांबच लांब वळसा घालून पश्चिम बाजूला जावे लागते. अनेकदा घाईगडबडीत लोकल पकडताना प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी मोठा वेळखाऊ फेरा मारावा लागतो. यामुळे अनेकांच्या लोकल चुकतात, तर काही जण नाईलाजाने विनातिकिट प्रवास करण्यास प्रवृत्त होतात, ज्यामुळे पुढे दंडात्मक कारवाईची भीतीही त्यांच्यावर असते.

ज्येष्ठ नागरिक आणि महिला वर्गाला या लांब अंतराच्या चालण्यामुळे मोठा शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिक आणि प्रवासी संघटनांनी मध्य रेल्वे प्रशासनाकडे अनेकदा निवेदने देऊनही या समकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाने आणि सिडकोने याची तातडीने दखल घेऊन न्हावाशेवा स्टेशनच्या पूर्व बाजूला तात्काळ तिकीट खिडकी किंवा स्वयंचलित तिकीट यंत्र बसवावे, अशी जोरदार मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.



● मुरुड-जंजिरा किल्ल्यासमोर सर्वात मोठी ओहोटी असल्याने पाणी खूप आटत असून समुद्रातील खडक दिसत आहेत. परिसरातील बोटींना सावध होऊन फेरी करावी लागत आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# साबणाच्या बॉक्समधून मद्याची तस्करी

## ऐरोलीत १.३० कोटींचा मुद्देमाल जप्त

**| कळंबोली | प्रतिनिधी |**

गोवा राज्यातनिर्मित आणि महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या मद्याची अवैध वाहतूक उघडकीस आणण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोकण विभागीय भरारी पथकाला यश आले आहे. ऐरोली रेल्वेस्थानकासमोरील बेलापूर-ठाणे मार्गावर सापळा रचून बाराचाकी ट्रक पकडण्यात आला. या कारवाईत मद्याचे एक हजार बॉक्स, त्यातील ४८ हजार बाटल्या आणि ट्रक असा एकूण १ कोटी ३० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी जावेदखान नवाबखान पिंजारी (वय २४, रा. शिरपूर, जि. धुळे) याला अटक करण्यात आली आहे.



बेलापूर-ठाणे मार्गावरून परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोकण विभागीय भरारी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ऐरोली रेल्वेस्थानकासमोर सापळा रचला. यावेळी चॉकलेटी आणि पांढऱ्या रंगाचा टाटा कंपनीचा बाराचाकी ट्रक (क्रमांक एमएच-१०-एडब्ल्यू-५२९४) अडवून त्याची तपासणी करण्यात आली.

ट्रकचालकाने वाहनामध्ये साबणाचे बॉक्स असल्याचे सांगितले. मात्र, पथकाने ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खाकी रंगाचे बॉक्स आढळून आले. या बॉक्सची तपासणी केली असता त्यात गोवा राज्यातनिर्मित रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या बाटल्या आढळल्या. महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या या मद्याच्या बाटल्यांवर बॅच क्रमांक आणि कमाल किरकोळ किंमत नमूद नसल्याचेही तपासात निर्दर्शनास आले.

पथकाने एकूण एक हजार बॉक्समधील ४८ हजार मद्याच्या बाटल्यास वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या बाराचाकी ट्रकही जप्त करण्यात आला. या संपूर्ण मुद्देमालाची किंमत एक कोटी ३० लाख ६० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी जावेदखान नवाबखान पिंजारी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वावे येथील खेडेकर यांनी जपली परंपरा | ग्रामीण भागात व्यवसाय तेजीत सुरु

# कोळश्याच्या इस्त्रीचा व्यवसाय तग धरून

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी|**

आधुनिकतेमुळे विजेवर चालणाऱ्या इस्त्रीला मागणी वाढली. त्यामुळे कोळश्याच्या इस्त्रीचा व्यवसाय कालबाह्य होण्याच्या वाटेवर होता. मात्र, अलिबाग तालुक्यातील वावे येथील मारुती खेडेकर यांनी या व्यवसायाची ३० वर्षांची परंपरा आजही जपली आहे. वावे पंचकोशीतील अनेक ग्राहक आजही कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीने प्रेस केलेल्या कपड्यांना पसंती दर्शवित आहेत. या व्यवसायाने अस्तित्व टीकवून ठेवले आहे.



कोळश्याची इस्त्रीचा व्यवसाय पारंपारिक आहे.त्याला प्रचंड मागणी होती. मात्र, आधुनिकतेमुळे विजेवर चालणाऱ्या इस्त्रीचा क्रेझ वाढला. वजनाने हलक्या स्वरुपाच्या इस्त्री बाजारात दाखल झाल्या. त्यामुळे कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीचा व्यवसाय कालबाह्य होण्याच्या वाटेवर होता. हा व्यवसाय लुप्त होण्याच्या मार्गावर असताना, ग्रामीण भागासह निमशहरी भागात आजही विजेचा लपंडाव वाढत गेला. सतत विज पुरवठा खंडीत होऊ लागल्याने विजेवर चालणाऱ्या इस्त्रीपेक्षा कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीला आता मागणी वाढू लागली आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीचा व्यवसाय तेजीत सुरु आहे. आधुनिकतेच्या युगात कोळश्यावर चालणारा इस्त्रीचा व्यवसाय टीकून ठेवण्याचे काम अलिबाग तालुक्यातील वावे येथील खेडेकरांनी केले आहे.

> गेल्या तीस वर्षापासून कोळश्यावर चालणारा इस्त्रीचा व्यवसाय चालू आहे. ग्रामीण भागातील वावे परिसरातील व अन्य भागातील ग्राहक कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीचे कपडे घालण्यावर भर देतात. त्यामुळे आजही व्यवसाय तेजीत असून ग्राहकांकडून चांगली प्रतिसाद मिळत आहे.
>
> **-मारुती खेडेकर, व्यावसायिक**

ग्राहकांच्या सेवेसाठी महागाईचा विचार न करता, रास्त दरात कपडे प्रेस करून देण्याचे काम केले जात आहे. गेल्या ३० वर्षापासून कोळश्यावर चालणारा व्यवसाय ते करीत आहेत. ग्रामीण भागात हा व्यवसाय हा तेजीत सुरु आहे.

ग्रामीण भागातील महाजने, बेलोशीसह मुळखानाव, सुडकोली, सराई, मल्याण, रामराज, कुणे, आंबेपूर, घोटवडे, काविर या भागातील दोनशेहून अधिक ग्राहक आजही कायम आहे. या भागातील ग्राहक कोळश्यावर चालणाऱ्या इस्त्रीचे कपडे परिधान करण्यामध्ये पसंती दर्शवितात. कोळश्याचा दर वाढले असले, तरी हा व्यवसाय जपण्याचे काम खेडेकर या व्यावसायिकांनी केले आहे.

# कितीही चलाख्या करा, पण...

जंतर मंतर हा एकेकाळी जादुगारांचा मंत्र असे. असा मंत्र उच्चारून डोळ्यादेखत ते वस्तू गायब करून दाखवत. किंवा हवेतून नसलेल्या वस्तू काढून दाखवत. मोदी सरकारने मंगळवारी एक आदेश काढून जंतरमंतर मैदान गायब करून टाकले. केंद्र सरकारचे डोके ठिकाणावर नाही असे कालच या स्तंभात आम्ही म्हटले होते. जंतरमंतरचा निर्णय हा सरकारच्या दडपशाहीचा आणखी एक नमुना आहे. हा प्रश्न केवळ दिल्लीतील एका मैदानाचा नाही. सरकारच्या वृत्तीचा आहे. खरे तर या सरकारला निवडणुका, विरोधक, पत्रकार यांच्यावर कायमची बंदी घालता आली तर आवडेल अशी स्थिती आहे. त्यांना आपल्याच तंत्राने एकहुकुमी कारभार करायचा आहे. पण आपण लोकशाहीवादी आहोत असे त्यांना दाखवावे लागते. त्यांच्या भक्तांनाही आपण लोकशाहीत जगतो आहोत असा भ्रम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळेच हे सरकार विरोधकांना सहन करते. मात्र त्यांना विरोधासाठी चिमूटभरही जागा मिळू नये याची पदोपदी काळजी घेतली जाते. मिडियाची अवस्था गुलामापेक्षाही वाईट आहे. तिथे विरोधकांवर सतत टीका होईल असा बंदोबस्त झालेला आहे. आता बाहेरच्या जागाही बंद केल्या जात आहेत. मध्यंतरी मुंबईतील आझाद मैदानात पॅलेस्टिनींच्या समर्थनार्थ निदर्शने करायला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला बंदी करण्यात आली. पोलिसांनी परवानगी नाकारली म्हणून मुंबई उच्च न्यायालयात गेले असता तिथले न्यायाधीश म्हणाले की हजारो मैलांवरच्या प्रश्नासाठी तुम्ही इथे कशाला आंदोलन करता आहात? न्यायदेवता म्हणवणाऱ्यांनी अशा प्रकारच्या पूर्वग्रहांचे दर्शन घडवावे हे भयंकर होते. एका विशिष्ट समाजाबद्दलचा द्वेष आणि दुसऱ्या विशिष्ट विचारसरणीबद्दलचे प्रेम यामधून असा शेरा मारला गेला का असा प्रश्न त्यावेळी कोणालाही पडला असेल. अशा रीतीने न्यायपालिकेतही मोदी-छाप सरकारी दृष्टिकोनाचा शिरकाव झाला आहे की काय असे वाटण्याजोग्या घटना घडत असतात. असो.

### आंदोलकांना नाहीसे करण्यासाठी

गेल्या काही दिवसात निवडणूक आयोगाविरुध्द सातत्याने आंदोलने चालू आहेत. काँग्रेससह सर्व पक्षांनी आयोगाचा पक्षपाती कारभार उघडा पाडला आहे. कॉकरोच जनता पार्टीच्या सहभागाने या विरोधाला नवी धार आली आहे. वास्तविक याबाबत निवडणूक आयोगाने संगतवार खुलासा करणारी पत्रकार परिषद घ्यायला हवी. सरकारचे प्रमुख म्हणून मोदी किंवा गृहमंत्री अमित शहा यांनी बोलायला हवे. पण ते न होता भाजपचे प्रवक्ते राहुल गांधी आणि काँग्रेसवर जुनेच आरोप करत आहेत. दिल्लीत दिवसाढवळ्या दडपशाही चालू असताना भाजपच्या प्रवक्त्यांनी इंदिरा गांधींच्या आणीबाणीची जुनी रेकॉर्ड लावावी यातच त्यांचा पराभव आहे. आता तर जंतरमंतरवरच बंदी घालण्यात आली आहे. दिल्लीत अत्यंत मोक्याच्या अशा कनॉट प्लेसलगत हे मैदान आहे. तिथे आजवर असंख्य आंदोलने, निदर्शने झाली. जुलै महिन्यातले नीट पेपरफुटीवरचे आंदोलनही तिथेच झाले. पण आता त्याच मैदानाची सरकारला अडचण होऊ लागली आहे. यापूर्वी याच सरकारने या मैदानाला आंदोलनासाठीची अधिकृत जागा म्हणून त्याला परवानगी दिली होती. आता ती काढून घेतली आहे. अजूनही मध्य दिल्लीत रामलीला मैदान उपलब्ध आहे. मात्र रामलीला मैदानावर सध्या तरी नवरात्री व दसऱ्याचे कार्यक्रम सुरू आहेत. शिवाय, या मैदानावर सतत कसली ना कसली प्रदर्शने भरलेली असतात व जत्रा चालू असतात. पीटीआयच्या बातमीनुसार ते डिसेंबरअखेरपर्यंत बुक्ड आहे. याचाच अर्थ आता राजकीय पक्षांना किंवा सीजेपीला आंदोलन करायचे असेल तर मुख्य दिल्लीपासून किमान २५ किलोमीटर दूर जावे लागेल. अलिकडेच मनोज जरांगे यांना मुंबईत आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली. नवी मुंबईत खारघरला आंदोलन करा असे सांगण्यात आले. कोणाही आंदोलकांना पोचण्यासाठी खारघर हे गैरसोयीचे आहे. शिवाय मिडिया वगैरे तिथे येणे कठीण आहे. थोडक्यात एका कोपऱ्यात जा आणि तुम्ही बोंबलत बसा असे सरकारचे म्हणणे आहे. दिल्लीत नेमके हेच केले जात आहे. याला उत्तर एकच उरते. ते म्हणजे विरोधकांनी रस्त्यावर उतरणे. बुधवारी राहुल गांधी व इंडिया आघाडीने तेच करून दाखवले. सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्याच्या निमित्ताने त्यांनी आजूबाजूचे रस्ते मोर्चेकऱ्यांनी भरून टाकले. यात अर्थातच नागरिकांची व नोकरदारांची गैरसोय झाली असेल. पण सरकारने विरोधाच्या जागा हडपल्या आणि आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला तर याच रीतीने तो बाहेर पडणार हे समजून घ्यायला हवे. सामान्य नागरिकांनी सरकारला जमेल त्या रीतीने भाजपवाल्यांना याचा जाब विचारायला हवा.

### हिशेब होणारच

कॉकरोच जनता पार्टीने जंतरमंतरवर आंदोलनासाठी परवानगी मागण्याचा अर्ज करताच ते बंद करण्याचा आदेश आला. आता आपण २४ तासात नवीन आंदोलनाचा निर्णय जाहीर करू असे त्यांनी म्हटले आहे. भाजप या निमित्ताने विरोधकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करीत असते. पण सरकारविरुध्दची सर्व आंदोलने एकाच दिशेने जाणारी आहेत व त्यांच्यात कोणताही भेद नाही असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले आहे. आता ही वज्रमूठ एकत्र ठेवायला हवी. कारण सत्तेला धोका निर्माण होतो आहे असे दिसले की हे सरकार कोणत्याही थराला जाऊ शकेल. जंतरमंतर ही त्याची चुणूक आहे. उद्या घाऊक प्रमाणात नेत्यांना आत टाकले जाऊ शकते. सीजेपीच्या नेत्यांना ताब्यात घेणे व त्यांच्याकडून बाँड लिहून घेणे हा त्याचाच एक भाग होता. निवडणूक आयोगाच्या मार्फत या सरकारने खूप मोठ्या भानगडी केल्या आहेत. त्या समोर आल्या की भाजपच्या निवडणुकीतील अभूतपूर्व विजयांचे रहस्य कदाचित उलगडू शकेल. महाराष्ट्रात २०१९ ते २४ या साडेचार वर्षांमध्ये ३२ लाख नवीन मतदार यादीत समाविष्ट झाले. याउलट २०२४ च्या लोकसभा निवडणुका झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये ४० लाख नवीन मतदार जोडले गेले. चार वर्षात जितके मतदार आले नाहीत त्याहून अधिक मतदार सहा महिन्यांमध्ये समाविष्ट झाले. आणि आता सध्या चालू असलेल्या मतदार तपासणी मोहिमेमध्ये दोन कोटींहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. देशात ही वगळणूक सर्वाधिक आहे. हे सर्व काय चालले आहे याचा खुलासा व्हायला हवा. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान संपल्यावर कित्येक लाख मतदारांनी रांगा लावून मतदान केल्याचे कागदावर दाखवण्यात आले. पण याचे व्हिडिओ फुटेज मागितले तर त्याबाबत नियमच बदलण्यात आले. सध्या कर्नाटक व इतर काही ठिकाणी फॉर्म सात भरून शेकडो मुस्लिम मतदारांबाबत तक्रारी करण्यात आल्या व त्यांची नावे यादीतून उडवण्यात आली. असे करणारे भाजपचे लोक असल्याचे निष्पन्न झाले. हे सर्व निवडणूक आयोगाच्या नाकाखाली चालू होते व आहे. उघडच एक तर आयोग यावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी आहे किंवा राहुल गांधी यांनी काल म्हटल्याप्रमाणे ज्ञानेश कुमार आणि मंडळी सरकारच्या इशाऱ्यावरून हे सर्व करीत आहेत. विरोधकांच्या आंदोलनातून हे कारस्थान बाहेर फुटण्याची वेळ आली आहे. ते रोखण्याचा प्रयत्न म्हणून जंतरमंतर गायब केले जात आहे. पण आता असल्या चलाख्या सरकारला वाचवू शकणार नाहीत.

---

विचार

# न्याय हवा, झुंडशाही नको!

**मुंबई 'आयआयटी'तील विद्यार्थी साहिल वाकोडेच्या आत्महत्येने विद्यार्थी कल्याण, परीक्षा पद्धती, प्राध्यापक-विद्यार्थी संबंध आणि संस्थात्मक संवेदनशीलता हे मुद्दे पुन्हा ऐरणीवर आले. या प्रकरणी प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांच्याविरोधात जातीय भेदभावाचा आरोप झाला आहे. मात्र यामुळे आरोप सिद्ध होत नाही तसेच आंदोलनाच्या दबावाखाली तातडीने शिक्षा ठोठावणे म्हणजे न्याय नव्हे. तपास यंत्रणेला निष्पक्षपणे काम करू द्यायलाच हवे.**

भागा वरखडे

मुंबई आयआयटीसारख्या देशातील अत्यंत प्रतिष्ठित संस्थेच्या आवारात एका तरुण विद्यार्थ्याने जीवन संपवणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नाही, तर शिक्षणव्यवस्थेच्या संवेदनशीलतेचीही कठोर परीक्षा आहे. साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या आत्महत्येनंतर अनेक गंभीर आरोप झाले. परीक्षेदरम्यान त्याच्याकडे मोबाइल आढळल्याचे संस्थेने सुरुवातीला म्हटले. त्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी जातीय भेदभाव, मानसिक छळ आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे आरोप केले. या आरोपांच्या आधारे प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आणि प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सर्वप्रथम एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे, की साहिलने आत्महत्या का केली, त्याच्या मृत्यूमागे नेमके कोणते मानसिक, शैक्षणिक, सामाजिक किंवा संस्थात्मक घटक होते, याचे उत्तर आंदोलनाच्या घोषणांमधून मिळणार नाही; ते तपासातूनच मिळेल. सीसीटीव्ही चित्रफिती, परीक्षेतील घटनाक्रम, संबंधित विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे जबाब, डिजिटल पुरावे, पूर्वीचे संवाद आणि उपलब्ध कागदपत्रे यांचा तपास करूनच सत्यापर्यंत पोहोचता येईल. गुन्हे शाखा सध्या साहिलच्या मृत्यूपूर्वीच्या हालचालींची पुनर्रचना करण्यासाठी सीसीटीव्ही आणि इतर पुरावे तपासत आहे; पण तपासाला वेळ देण्याऐवजी रस्त्यावरची ताकद, घोषणाबाजी आणि सामूहिक दबाव यांच्यामार्फत मागण्या तातडीने मान्य करून घेण्याचा पायंडा पडत असेल, तर तो शिक्षणसंस्थांसाठी धोकादायक ठरू शकतो. आंदोलन हा लोकशाहीतील वैध मार्ग आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचा, प्रशासनाला जाब विचारण्याचा आणि आपल्या मागण्या मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे; परंतु आंदोलन आणि झुंडशाही यांच्यातील सीमारेषा पुसली गेली, तर न्यायप्रक्रियेलाच धोका निर्माण होतो.

या प्रकरणात विद्यार्थ्यांनी विविध मागण्या केल्या. त्यात स्वतंत्र चौकशी, विद्यार्थी कल्याणाशी संबंधित बदल, मानसिक आरोग्याच्या सुविधा आणि प्राध्यापकांवरील कारवाईसह अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. संस्थेने १८ मागण्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शवली. त्याच पार्श्वभूमीवर प्रा. दुल्ला यांना अधिष्ठाता पदाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांपासून तात्पुरते दूर करण्यात आले; मात्र ते प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिले. संस्थेने पुढील कारवाई तपासाच्या निष्कर्षांनंतर करण्याचे स्पष्ट केले आहे. याकडे दोन टोकांच्या चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. एका बाजूला विद्यार्थ्यांच्या भावनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. त्याच्या कुटुंबाने गंभीर आरोप केले आहेत. संस्थेच्या सुरुवातीच्या निवेदनावरही प्रश्न उपस्थित झाले आणि नंतर 'आयआयटी' मुंबईने त्या निवेदनाबद्दल माफी मागून तपास पूर्ण होण्यापूर्वी परिस्थितीविषयी भाष्य करणे योग्य नसल्याचे मान्य केले. दुसऱ्या बाजूला, आरोप झाले म्हणून संबंधित व्यक्ती दोषी ठरते, असा समजही तितकाच घातक आहे. या प्रकरणात प्राध्यापकांच्या समर्थनार्थ 'आयआयटीच्या फॅकल्टी फोरम'ने ठोस भूमिका घेतली. त्यांचे म्हणणे आहे, की प्राध्यापकांनी संस्थेच्या नियमांनुसार काम केले. काही विद्यार्थ्यांनीही निष्पक्ष तपासाची गरज व्यक्त केली आहे. म्हणजेच खुद्द कॅम्पसमध्येही या प्रकरणाकडे पाहण्याचे एकापेक्षा अधिक दृष्टिकोन आहेत. म्हणूनच आता सर्वात महत्त्वाचे आहे ते आरोप आणि निष्कर्ष यांच्यामधील अंतर कायम ठेवणे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास होणे ही कायद्याची प्रक्रिया आहे. त्या तपासाचा निष्कर्ष येण्याआधी एखाद्याला दोषी ठरवणे, सामाजिकदृष्ट्या आरोपीच्या पलीकडे गुन्हेगार मानणे किंवा दबाव आणून त्याच्यावर अंतिम कारवाई करवून घेणे हे न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. उद्या कोणत्याही महाविद्यालयात किंवा विद्यापीठात एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या प्राध्यापकाविरोधात गंभीर आरोप केला आणि त्यानंतर जमावाच्या दबावामुळे संबंधित प्राध्यापकाला तातडीने दोषी मानले गेले, तर संस्थांमधील शिस्त, नियम आणि न्यायनिवाड्याची संपूर्ण प्रक्रिया कुठे उरेल? याचा अर्थ विद्यार्थ्यांनी गप्प बसावे, असा अजिबात नाही. उलट, विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकले गेले पाहिजे. तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी असली पाहिजे. मानसिक ताण, शैक्षणिक दबाव, जातीय भेदभावाच्या तक्रारी, प्राध्यापकांचे वर्तन, परीक्षेतील नियम आणि शिस्तभंगाची प्रक्रिया याबाबत पारदर्शक व्यवस्था असली पाहिजे. विद्यार्थ्याला समस्या मांडण्यासाठी प्राचार्य, अधिष्ठाता किंवा प्रशासनाच्या दारात वारंवार धावाधाव करावी लागणार नाही, अशी सक्षम यंत्रणा असणे ही कोणत्याही उच्च शिक्षणसंस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. इथे प्राध्यापकांच्या भूमिकेचाही प्रश्न निर्माण होतो. शिक्षक हा केवळ नियमांची अंमलबजावणी करणारा अधिकारी नसतो. तो विद्यार्थ्याचा मार्गदर्शकही असतो. परीक्षा हॉलमध्ये गैरप्रकार आढळल्यास नियम लागू करणे आवश्यक आहे. नियम मोडल्यास शिस्तभंगाची कारवाईही आवश्यक असू शकते; परंतु नियमांची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्याच्या मानवी बाजूचा विसर पडू नये.

कठोर शिस्त आणि अमानुष वर्तन यात महत्त्वाचा फरक आहे. शिक्षणसंस्थेतील शिस्त ही भीतीवर उभी राहू शकत नाही. विद्यार्थी नियमांचे पालन करतात, कारण त्यांना नियम न्याय्य वाटतात, अशी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. प्राध्यापकांच्या एका वाक्याचा, एका नजरेचा किंवा सार्वजनिकरीत्या केलेल्या एका टिप्पणीचा विद्यार्थ्याच्या मनावर किती परिणाम होऊ शकतो, याची जाणीव शिक्षकांनी ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनीही प्रत्येक कठोर शैक्षणिक निर्णयाला छळ किंवा अन्यायाचे रूप देण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासली पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी आधीच प्रचंड दबावाखाली असतात. गुण, परीक्षा, प्लेसमेंट, संशोधन, भविष्याची चिंता, आर्थिक अडचणी, सामाजिक अपेक्षा आणि कुटुंबीयांचा दबाव यांचा भार त्यांच्या मनावर असतो. अशा परिस्थितीत संस्थेने विद्यार्थ्यांकडे केवळ 'रोल नंबर' किंवा 'कामगिरीचा आकडा' म्हणून पाहणे ही मोठी चूक आहे. प्रत्येक कॅम्पसमध्ये समुपदेशन, मानसिक आरोग्य सेवा, तक्रार निवारण आणि संकटाच्या वेळी तातडीची मदत उपलब्ध असणे गरजेचे आहे; मात्र विद्यार्थी कल्याणाच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी झुंडशाहीचा आधार घेण्याची गरज नसावी. प्रशासनाने मागण्या मान्य केल्या, की आंदोलन यशस्वी झाले आणि तपासाच्या आधीच व्यक्तीवर कारवाई झाली, की न्याय मिळाला, अशी समीकरणे तयार झाली, तर भविष्यात प्रत्येक संवेदनशील प्रकरणाचा शेवट संस्थात्मक प्रक्रियेत न होता दबावाच्या राजकारणात होण्याची शक्यता वाढेल.

'आयआयटी मुंबई'च्या प्रकरणाने आणखी एका धोक्याकडे लक्ष वेधले आहे. विद्यार्थी आणि शिक्षक हे परस्परविरोधी गट नाहीत. एका विद्यार्थ्याच्या मृत्यूनंतर विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित करणे स्वाभाविक आहे. त्याच वेळी प्राध्यापकांनी आपल्या सहकाऱ्याच्या निष्पक्ष चौकशीच्या अधिकाराचे समर्थन करणेही स्वाभाविक आहे. दोन्ही बाजूंना एकाच वेळी जागा देणारी प्रक्रिया उभी करणे हे प्रशासनाचे काम आहे. एकाला गप्प करून दुसऱ्याला विजयी घोषित करणे हा मार्ग नाही. या घटनेनंतर 'आयआयटी' प्रशासनाने केलेली माफीही महत्त्वाची आहे. तपास सुरू असताना मृत विद्यार्थ्याच्या वर्तनाबाबत निष्कर्षात्मक भाषा वापरणे टाळले पाहिजे. मृत व्यक्ती स्वतःचा बचाव करू शकत नाही. त्यामुळे कोणत्याही संस्थेने मृत विद्यार्थ्याविषयी सार्वजनिक निवेदन करताना अधिक संवेदनशीलता आणि संयम दाखवणे आवश्यक आहे. साहिलच्या मृत्यूचे खरे कारण शोधणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही, संस्थेनेही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना तक्रार करण्यासाठी सुरक्षित वातावरण होते का? त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी होती का? प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद पुरेसा होता का? परीक्षा आणि शिस्तभंगाच्या नियमांमध्ये मानवी संवेदनशीलतेला स्थान आहे का? संकटात असलेल्या विद्यार्थ्याला ओळखण्यासाठी आणि मदत करण्यासाठी यंत्रणा सक्षम आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे तितकेच महत्त्वाचे आहे. साहिलला परत आणता येणार नाही; पण त्याच्या मृत्यूनंतरही आपण फक्त दोषी कोण, निर्दोष कोण, कोणाची मागणी मान्य झाली आणि कोणाचा दबाव चालला, एवढ्यापुरतेच हे प्रकरण पाहिले तर त्या मृत्युतून समाजाला काहीही शिकता येणार नाही. न्यायव्यवस्थेचा पाया पुराव्यावर असतो, घोषणांवर नाही. शिक्षणसंस्थेचा पाया विश्वासावर असतो, भीतीवर नाही. विद्यार्थी आंदोलनाचा पाया प्रश्न विचारण्याच्या अधिकारावर असतो, तर प्रशासनाचा पाया पारदर्शकतेवर आणि शिक्षकाच्या भूमिकेचा पाया केवळ शिस्तीत नसून संवेदनशीलतेतही असतो. म्हणूनच साहिल वाकोडे प्रकरणात दोन गोष्टी एकाच वेळी घडल्या पाहिजेत. आरोपांची कसून, निष्पक्ष आणि वेळेत चौकशी झाली पाहिजे आणि दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे; पण तपास पूर्ण होण्याआधी कोणालाही दोषी ठरवण्याची किंवा झुंडशाहीच्या दबावातून अंतिम निर्णय घेण्याची पद्धत स्वीकारता कामा नये. विद्यार्थ्यांना न्याय हवा आहे. तो मिळायलाच हवा; पण न्याय मिळवण्याची प्रक्रियाच आपण कमकुवत केली, तर उद्या त्याच प्रक्रियेचा फटका विद्यार्थ्यांनाही बसू शकतो. झुंडशाहीला बळी न पडता सत्याला सामोरे जाणे, आरोपांचा तपास नीट करणे आणि विद्यार्थ्यांच्या वेदनेला संवेदनशीलतेने प्रतिसाद देणे हीच या शोकांतिकेतून शिक्षणव्यवस्थेने घ्यायची खरी शिकवण आहे.

---

चर्चा आजची

# नवरात्रीचे बाजारीकरण



वैभव पाटील

सण-उत्सव हे आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. परंपरेने चालत आलेले ह्या उत्सवाचे स्वरूप आजच्या घडीला बदलले असले तरी पूर्णतः ते संपुष्टात आलेले नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होत आलेले आहे. आणि आपणही हे सण-उत्सव तितक्याच आनंद व उत्साहाने साजरे करतो. पूर्वापार चालत आलेल्या या उत्सवांनी मानवी जीवनाला संजीवनी देण्याचे काम केलेले आहे. मानवी नाते-संबंध, आपुलकी, जिव्हाळा, कृतज्ञता, संवेदनशीलता यांना खतपाणी घालण्याचे काम सण-उत्सव करीत आले आहे. शारीरिक, मानसिक, वैचारिक, बौद्धिक या घटकांचे पोषण करणारे असे होते. मनोरंजनाचा व करमणुकीचा भाग जरी त्यात असला तरी आचार-विचारांनी उत्तम पिढ्या घडवण्याचे कार्य हे उत्सव करीत असत. समाजात जे-जे म्हणून चांगले आहे हे सगळ्यांपर्यंत पोहोचवणे आणि समाजातील वाईट,चुकीचे जे आहे त्यावर बोट ठेवून निषेध करणे;म्हणजे एकप्रकारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य या उत्सवांनी केले आहे.

आदिशक्ती तू आदिमाया असं म्हणत नवरात्री मध्ये स्त्रीशक्तीची पूजा केली जाते. उत्सवांचे मूळ उद्देश समाजामधे जागृती होऊन विधायक विचार वाढीस लागावा हाच असतो. मात्र या देवीच्या विसर्जन मिरवणूकीत पूर्वी ङ्गगरबाफ या नृत्याच्या वेळी देवीची, गीतेच म्हटली जात असत. आज या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर अश्लील अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. गरब्याच्या निमित्ताने व्यभिचारही होतो. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. वाढलेली लोकसंख्या त्यातच कागदी शिक्षण, व्यसनांच्या आहारी गेलेली दिशाहीन तरुणाई, कोणतीही वैचारीक बैठक नसलेली ही गर्दी नक्की समाजाच्या मुख्य प्रवाहात कशी येणार हा खरा प्रश्न आहे. गाव,शहर बदलले तरी कमी अधिक फरकाने हेच चित्र सर्वत्र आहे यात शंका नाही. सात्विक रित्या सण उत्सव आजही खूप ठिकाणी साजरे होतात पण हे बिभित्स चित्र दिसणार असेल तर त्या देवीच्या ही मनातही आपण या प्रवृत्तीचा संहार करावा हेही नक्की येत असेल. या पडद्यासमोरचे चित्र असले तरी तरूणाई स्वैर का होतेय या पाठीमागील खऱ्या कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे. त्यांच्या क्रयशक्तीचा विधायक कामांसाठी कुटुंबासाठी, समाजासाठी होण्यासाठी वैचारीक परिवर्तन घडविण्याचे व दिशा देण्याचे काम समाजातील मान्यवर जबाबदार अनुभवी व्यक्तींचे आहे हे मात्र निश्चित.

प्रत्येक उत्सवामागे समता, बंधुता हि जीवनमुल्ले दडलेली आहेत. तुम्ही जर शोधली तर ती तुम्हाला सापडतील. परंतु आपण मात्र आजच्या घडीला त्याला केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहत आहोत आणि इच्छांची पोळी त्यावर भाजत आहोत. आधीच्या उत्सवाचे संस्कार वातावरण जाऊन त्याची जागा चंगळवादी वृत्ती आणि प्रदूषणाने घेतली. ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यातून आरोग्याला धोका पोहोचू लागला. वाट्टेल तसे भले मोठे मंडप घालणे, लायटिंग करणे,मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर लावणे हे तर नित्याचेच होऊन बसले. म्हणजे खरे तर देव असे म्हणत नाही की असा अवाजवी खर्च करून आमचे स्वागत करा;पण लोकांनी देवालाही स्पर्धेत उतरवले. कुठल्या मंडळाची सजावट चांगली त्यावर क्रमांक दिल्या गेले. पण असे करून देव थोडाच प्रसन्न होणार आहे. त्याला तर मनोभावे केलेला नमस्कारही पोहोचतो. खोट्या दिखाव्याची त्याला आवश्यकता नाही. म्हणजे इथे सुद्धा मानवाने आपल्या इच्छा,अपेक्षा त्याच्यावर लादल्या पण कायम देवाकडे काही मागण्यापेक्षा आपल्याला दाता ही होता आले पाहिजे. समजला,नव्या घडणाऱ्या पिढीला आपल्याकडून जितके म्हणून काही चांगले देता येईल असे आपण वागले पाहिजे. ज्ञानात,बुद्धीत भर पाडणाऱ्या संस्कारक्षम स्पर्धा आपण आयोजित केल्या पाहिजेत. त्यांच्यात दडलेल्या सुप्त गुणांना वाव मिळेल. आणि हसत-खेळत आनंदी वातावरणाची निर्मिती करून अगदी सहजरित्या आपण त्यांना बोधामृत देऊ शकू,असे काहीतरी करायला हवे. आजची एकंदरीत सामाजिक स्थिती पाहता ती बदलण्यासाठी व त्याच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी खरे तर उत्सवांचे आयोजन असते. हीच त्यामागील प्रमुख भूमिका व उद्दिष्ट होय. परंतु निरर्थक असे वेळ वाया घालवणाऱ्या कर्यक्रमांचे प्रस्थ हल्ली खूप वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. घरगुती अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जाणाऱ्या उत्सवांना आपण उगाच मोठे स्वरूप दिले. परंतु दिखाव्याने उद्दिष्ट साध्य होत नाही;त्याकरिता कृतीला विचारांची जोड हवी. अजूनही वेळ गेलेली नाही आपण जर ठरवले तर आपली उत्सवांची ही संस्कृती जपू शकू व तिचे संवर्धन करू शकू.

---

लोकसंसद

## दृष्ट शक्तीचा संहार करण्यासाठी स्त्रियांनो सिद्ध व्हा !

राज्यासह देश भौतिकदृष्ट्या प्रगतीपथावर वेगाने मार्गक्रमण करत असला तरी महिलांच्या सुरक्षेबाबतचा प्रश्न दिवसागणिक तितकाच गंभीर होत चालला आहे. स्त्रियांवरील वाढते अत्याचार, अपहरण, लव्ह जिहाद, ब्लॅकमेलिंग यांसारख्या घटना मन विषिन्न करतात. नर्सरीत जाणाऱ्या बालिकेपासून ७० वर्षांची वयोवृद्धाही आज सुरक्षित नाही. शहरासारख्या ठिकाणी आपल्या मुलीने उच्चशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी पालक सर्वतोपरी प्रयत्न करतात मात्र समाजातील वासनांध शक्तीच्या विरोधात लढण्यासाठी तिला मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी काहीच प्रयत्न करताना दिसत नाहीत. प्रत्येक स्त्रीमध्ये अफाट शक्ती असून तिने ती जागृत केल्यास कोणत्याही संकटाला धैयाने तोंड देऊ शकते समाजातील दृष्ट शक्तींचा संहार करू शकते हेच देवीने वेळोवेळी अवतार घेऊन दाखवून दिले आहे. स्त्रियांमधील हेच शक्तीतत्त्व जागृत करण्यासाठी यंदाच्या नवरात्रीत हिंदू जनजागृती समिती 'मैं हूँ दुर्गा' हे आगळे अभियान घेऊन आली आहे. हे अभियान देशभर राबवले जात असून या अभियानाच्या अंतर्गत १५ वर्षांपुढील मुलींना आणि स्त्रियांना लाठीकाठी, कराटे आणि नानचाकु चालवण्याचे विनामूल्य प्रशिक्षण दिले जात आहे. आज सहस्रो स्त्रियांनी या अभियानात नाव नोंदवून स्वरक्षण प्रशिक्षण घेण्यास आरंभ केला आहे. या अभियानाच्या निमित्ताने प्रत्येक घरातील स्त्रीला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सबळ करण्याचा समितीचा मानस असून अधिकाधिक स्त्रियांनी समितीच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून आपले नाव नोंदवून या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर**

---

दिनविशेष

# ई-कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई-कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई-कचरा कमी करणे आणि ई-कचऱ्याचा पुनर्वापर याबाबत जनजागृती करणे हा या दिवसामागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई-कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे, तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई-कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टनहून अधिक ई-कचरा जमा होतो; तर देशात ५ लाख टन ई-कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई-कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई-कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई-कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई-कचऱ्याविषयी जागृत नाही. काहींना तर ई-कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई-कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्याप्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई-कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई-कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई-कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅकचरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई-कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई-कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**- श्याम ठाणेदार**

# सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर

## • राधे गॅलेक्सी परिसरात दुर्गंधीसह अस्वच्छता • नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच?

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरातील भिसेगाव येथील राधे गॅलेक्सी कॉम्प्लेक्स परिसरात सांडपाण्याच्या योग्य विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर बनल्याची तक्रार समोर आली आहे. इमारतीतील सांडपाणी योग्य पद्धतीने वाहून नेण्याऐवजी ते परिसरातील खासगी मालमत्तेत व कंपाउंडमध्ये सोडले जात असल्याचा आरोप संबंधित नागरिकाने केला आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे तक्रार करण्यात आली आहे.

या प्रकरणी बाधित ज्येष्ठ नागरिक बळीराम बडेकर यांनी कर्जत नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे. मात्र, या तक्रारीवर प्रशासनाकडून नेमकी कोणती कार्यवाही करण्यात आली, याची माहिती अद्याप उपलब्ध नसल्याने या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या घराशेजारी असलेल्या राधे गॅलेक्सी कॉम्प्लेक्समधील सांडपाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आलेली नाही. या इमारतीतील ड्रेनेजचे पाणी थेट त्यांच्या मालमत्तेत म्हणजे कंपाउंडमध्ये सोडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मालमत्तेचे नुकसान होत असून परिसरात अस्वच्छता तसेच मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीमुळे आणि साचलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरात इमारती, निवासी संकुले आणि लोकवस्ती वाढत असताना सांडपाण्याच्या व्यवस्थापनाकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असेल, तर त्याचा त्रास केवळ एका व्यक्तीला नव्हे, तर संपूर्ण परिसरातील रहिवाशांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून सांडपाण्याचा स्रोत आणि त्याची विल्हेवाट लावण्याची पद्धत तपासणे आवश्यक आहे.

### आजारांचा धोका

साचलेल्या आणि उघड्यावर वाहणाऱ्या सांडपाण्यामुळे डास आणि इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होण्याची भीती तक्रारदाराने व्यक्त केली आहे. स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षित परिसर ही नागरिकांची मूलभूत अपेक्षा आहे. त्यामुळे सांडपाण्याच्या समस्येकडे केवळ किरकोळ तक्रार म्हणून न पाहता सार्वजनिक आरोग्याशी संबंधित प्रश्न म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

> “याबाबत एप्रिल महिन्यात तक्रार केली आहे. तक्रारी अर्ज देऊन पाच महिने उलटले तरी कर्जत नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. घराशेजारी सतत दुर्गंधीयुक्त सांडपाणी वाहत असून अस्वच्छतेचा त्रास सहन करावा लागत आहे.”
> – बळीराम बडेकर, तक्रारदार, भिसेगाव

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ ऑक्टोबर

१) श्रीम. हंसा शरद शेट अलिबाग, १४-१०-१९४२

२) श्रीम. पुष्पलता गजानन हरवंदे, पिंपळभाट, अलिबाग, १४-१०-१९४४

३) श्रीम. वंदना दत्तात्रेय भोसले अलिबाग, १४-१०-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



स्व. कलावती भवानजी देढिया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स, बाजारपेठ अलिबाग

## सुनीता मोरे यांचे निधन

| अलिबाग | प्रतिनिधी |

सुनीता दामोदर मोरे (८६) यांचे सोमवारी (दि.१२) वृद्धापकाळाने निधन झाले. भंडारी समाजाचे कार्यकर्ते संतोष मोरे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने मोरे कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून, भंडारी समाजासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवार, दि.२१ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता अलिबाग येथे होणार असून, बारावे शुक्रवार, दि.२३ रोजी होणार आहे.



## पनवेलमध्ये सजग नागरिकता कार्यशाळा




| खांदेश्वर | प्रतिनिधी |

वी.के. हायस्कूल, पनवेल येथे एक दिवसीय सजग नागरिकता कार्यशाळा उत्साहात पार पडली. प्रेमांकुर फाउंडेशन, संविधान महोत्सव समिती पनवेल, एम.एम. एन.एफ. पनवेल, संविधान प्रचारक आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पनवेल शाखेच्या कार्यकर्त्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत नागरिक म्हणून आपली भूमिका, सजग नागरिकतेचे महत्त्व, समाजातील नियम व कायद्यांची गरज, भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, संविधानाची उद्देशिका, मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ॲड. निलेश खानविलकर यांनी चर्चासत्रे, विविध खेळ आणि कृतीप्रधान उपक्रमांच्या माध्यमातून विषय सोप्या पद्धतीने सहभागींपर्यंत पोहोचविला. संविधानातील मूल्ये दैनंदिन जीवनात कशी अंगीकारावीत आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी नागरिकांनी कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, याविषयीही मार्गदर्शन केले.

## केळवणे येथे आरोग्य तपासणी शिबीर

| चिरनेर | प्रतिनिधी |

भारतीय महाक्रांती सेना आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, अष्टविनायक हॉस्पिटल, जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड व जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने केळवणे येथे सोमवारी (दि.१२) मोफत आरोग्य तपासणी शिबीर यशस्वीरीत्या पार पडले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या क्षयरोगमुक्त भारत १०० दिवस मोहिमे अंतर्गत भारतीय महाक्रांती सेना आरोग्य विभाग, अष्टविनायक हॉस्पिटल (मोहपाडा, रसायनी), जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड व जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने केळवणे ग्रामपंचायत येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी ९० नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.



या शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, ईसीजी, डॉक्टरांचा सल्ला, क्षयरोगाबाबत जनजागृती तसेच विविध आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तपासणीदरम्यान अधिक उपचारांची आवश्यकता असलेल्या ८ रुग्णांना पुढील उपचारासाठी अष्टविनायक हॉस्पिटल, मोहपाडा (रसायनी) येथे संदर्भित करण्यात आले.

आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, क्षयरोगाविषयी जनजागृती करणे व आजारांचे वेळेत निदान करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. उपस्थित नागरिकांनी आयोजक संस्थांच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशी शिबिरे सातत्याने आयोजित करण्याची अपेक्षा भारतीय महाक्रांती सेना यांच्याकडे व्यक्त केली.

## हरवलेला मोबाईल पर्यटक महिलेला परत

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानला येथे फिरायला आलेल्या एका पर्यटक महिलेचा मोबाईल हरवला होता. स्थानिकांच्या मदतीने मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत गावातील प्रामाणिक नागरिकांचे कौतुक केले.

पर्यटक महिला रुचिता श्रीराम या रविवारी (दि.११) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास आपल्या मैत्रिणीसोबत बाजारपेठेमध्ये एका कठड्यावर मोबाईल बाजूला ठेवून बसल्या होत्या. काही वेळाने त्या तिथून उठून गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपला मोबाईल हरवला आहे. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते अमोल चौगुले यांनी बराच वेळ शोध घेतला. त्यानंतर पर्यटक महिलने त्यांना सोबत घेऊन पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदवली. आजूबाजूला असणारे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता एका वयस्कर महिलेने मोबाईल उचलल्याचे अस्पष्ट दिसून आले. त्या स्थानिक महिला विमल शहा होत्या. शहा यांना मोबाईल बाबतीत फारशी माहिती नसल्याने त्यांनी तो मोबाईल शेजारी राहणारे तुषार सकपाळ यांना देऊन माहिती काढण्यास सांगितले.त्यावेळी अमोल चौगुले यांनी त्या पर्यटक महिलेला शोधून त्यांचा मोबाईल सुपूर्द केला.



## आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप

| उरण | प्रतिनिधी |

नवरात्रीत माणुसकीचा जागर म्हणून अनंत नारंगीकर कुटुंबाकडून उरण तालुक्यातील चिरनेर केळाचामाल वाडी येथील आदिवासी महिलांना मंगळवारी (दि.१३) साड्यांचे वाटप करण्यात आले.

गेली अनेक वर्षे अनंत नारंगीकर कुटुंबीय गोरगरीबांच्या उद्धारासाठी विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवत असून आदिवासी विद्यार्थी, महिला व दिव्यांग तरुणांसाठी विशेष पुढाकार घेत आहेत. दरम्यान, सालाबादप्रमाणे याही वर्षी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आदिवासी महिलांना साडी चोळी देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी अनंत नारंगीकर यांची आई सुमन शंकर नारंगीकर व पत्नी वंदना नारंगीकर यांसह केळ्याचा माळ अभिनव सेवा सहकारी संस्था मर्या. चिरनेरचे अध्यक्ष दत्तात्रय कातकरी, उपाध्यक्ष अशोक कातकरी, सचिव सुरेश कातकरी, महिला अध्यक्षा वैशाली वाघे, कविता कातकरी, अनिषा कातकरी, अश्विनी कातकरी, गुलाब सुरेश कातकरी, देवकी कातकरी, किर्ती कातकरी, पपी कातकरी, बेबी कातकरी, रुपाली कातकरी, रोहित कातकरी, दशरथ कातकरी, अमृत कातकरी, अजय कातकरी, अश्विन कातकरी यांसह सदस्य महिला उपस्थित होत्या.

## महावितरण कर्मचाऱ्यांची नेत्र तपासणी

| कल्याण | प्रतिनिधी |

सेवा सेतू आणि सेवा संकल्प अभियान अंतर्गत महावितरणच्या कल्याण पश्चिम विभाग कार्यालयांतर्गत येणाऱ्या अभियंता, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२५ पेक्षा अधिक अभियंता आणि कर्मचाऱ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. अनिल आय हॉस्पिटलच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अनिल आय हॉस्पिटलचे कर्मचारी सचिन सोनी, आलम, पंकज सिंग, त्रिभुवन यांनी या कामी सहकार्य केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी अधिक्षक अभियंता रविंद्र आव्हाड, कार्यकारी अभियंता राजेश काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता महेंद्र वाकपैजन, श्रीकृष्ण देशपांडे, योगेश मराठे यांनी मेहनत घेतली.



## पुस्तकांपलिकडील शिक्षणाचा अनुभव

### ■ हाजी मलंग येथे विद्यार्थिनींची शैक्षणिक सहल

| पनवेल | प्रतिनिधी |

मायनॉरिटी उर्दू गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनींसाठी हाजी मलंग डोंगरावर शैक्षणिक व मनोरंजक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीत विद्यार्थिनींना आध्यात्मिक वातावरण, निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक उपक्रम आणि ट्रेकिंगचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

या सहलीत मुख्याध्यापिका कुदसिया प्रिमुसवाला यांच्यासह शिक्षकवर्ग आणि शाळेची टीम विद्यार्थिनींसोबत उपस्थित होती. हाजी मलंग येथे पोहोचल्यानंतर विद्यार्थिनींनी दर्ग्यात दर्शन घेऊन प्रार्थना केली. तसेच नात पठण, शेरोशायरी आणि विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. डोंगरावरील ट्रेकिंगमुळे सहलीत साहसाचीही भर पडली.



वर्गखोलीबाहेर प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सामूहिक उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, शिस्त, संघभावना आणि परस्पर सहकार्याची भावना विकसित होण्यास मदत झाली.

या सहलीचे आयोजन हलीमाबाई झुलेवाली ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते. भविष्यात अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांसाठीही अशा शैक्षणिक व अनुभवाधारित सहली आयोजित करण्याचा मानस ट्रस्टने यावेळी व्यक्त केला.

### ‘मराठी माझी देवालाही आवडे’ कार्यक्रमाचे आयोजन | रसिकांसाठी विशेष पर्वणी ठरणार

# संगीताच्या माध्यमातून उलगडणार मराठी भाषेचा ‘सुवर्णप्रवास’

| पनवेल | प्रतिनिधी |

मराठी भाषा, संतसाहित्य आणि संगीतपरंपरेचा समृद्ध वारसा उलगडणारा मराठी माझी देवालाही आवडे या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने हा कार्यक्रम सादर होणार असून, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच ही या कार्यक्रमाची निमंत्रक संस्था आहे. संतसाहित्य, भक्तिरचना आणि संगीतपरंपरेतील भावसौंदर्याच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषेचा सांस्कृतिक प्रवास रसिकांसमोर उलगडणार आहे. मराठी भाषेचा अभिमान जागविणारा आणि संतपरंपरेतील साहित्यिक व सांगीतिक वैभवाचा अनुभव देणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे.

कार्यक्रमात कल्पिता राणे नृत्य सादर करणार असून, डॉ. राम पंडित आणि तन्वी गोरे गायन सादर करतील. कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन कल्पिता राणे यांचे असून, कल्पिता राणे आणि कल्पांगण सांस्कृतिक केंद्र हे कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. संगीतसाथ किरण चिटणीस (तबला), मंदार जाधव (पखवाज) आणि ओमकार चव्हाण (कीबोर्ड) देणार आहेत. याशिवाय परिन मोरे आणि अमलेंदु जोशी हे कलाकारही सहभागी होणार आहेत. कलाकारांचे संयोजन महेश चव्हाण (टीमवर्क्स मीडिया सोल्युशन्स) यांनी केले आहे.

सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मराठी भाषा, संतपरंपरा आणि संगीतवारशाचे जतन, संवर्धन व प्रसार करण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

### प्रवेशिका घेणे आवश्यक

या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असला, तरी रसिकांनी आसन निश्चितीसाठी प्रवेशिका घेणे आवश्यक आहे. बुधवार सकाळपासून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे प्रवेशिका उपलब्ध होणार आहेत. रसिकांनी नाट्यगृहातून प्रवेशिका प्राप्त करून आपली आसनव्यवस्था निश्चित करावी, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे. तसेच पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीनेही नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### ‘जुन्या विहिरींची स्वच्छता, दुरुस्ती करा’

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरातील जुन्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता, गाळ काढणे आणि आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी प्रभाग क्रमांक १७च्या नगरसेविका ॲड. शिवानी घरत यांनी महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. नवीन पनवेलमधील काही भागांत पाणीटंचाई जाणवत असताना अनेक जुन्या विहिरी जीर्ण अवस्थेत आहेत. या विहिरींची स्वच्छता व दुरुस्ती केल्यास त्या पुन्हा वापरात आणून उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करता येईल. त्यामुळे पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पर्यायी जलस्रोत उपलब्ध होण्यास मदत होईल. महापालिकेने सर्व विहिरींची पाहणी करून स्वच्छता, गाळ काढणे, आवश्यक दुरुस्ती आणि सुरक्षिततेसाठी संरक्षक उपाययोजना कराव्यात, यासाठी संबंधित विभागाला तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी ॲड. घरत यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



### जुन्या भांडणातून तरुणाला जीवे मारण्याचा प्रयत्न

**पनवेल :** जुन्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाच्या गळ्यावर फुटलेल्या बिअरच्या बाटलीने वार करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना पनवेलमध्ये घडली. याप्रकरणी किशोर संजय अडालेकर (वय २८, मूळ रा. पेठगाव, पनवेल; सध्या रा. कर्जत, जि. अहिल्यानगर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पळस्पे फाटा येथील राहुल पार्क हॉटेलमधील खोली क्रमांक १०३ मध्ये हा प्रकार घडला. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी सलमान जाफरदार पठाण (२७) यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने फुटलेल्या बिअरच्या बाटलीने गळ्यावर वार करून गंभीर जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. जखमीला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय माहिती प्राप्त झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजित बिरादार करीत आहेत.



### मुनवली येथे मार्गदर्शन शिबीर

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे रविवारी (दि.११) सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या माध्यमातून युनिट्रेड रिमेडीस आयुर्वेदिक संस्था, यांच्या तज्ज्ञांनी सर्व स्तरातील महिला व पुरुष ग्रामस्थांसाठी आरोग्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या आजारांवर मोलाचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध आजारांसंबंधी ग्रामस्थांनी विचारलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच त्या आजारांवर उपचार करण्यासाठी लागणाऱ्या औषधांबाबतीत उपस्थितांना महत्वपूर्ण माहिती देण्यात आली. याप्रसंगी आयुर्वेदिक संस्थेच्या वतीने मार्गदर्शन करण्यासाठी स्वरूप पाटील, राजेश गुराम उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी, दिलीप मोंढे यांच्यासह मुनवली पंचक्रोशीतील महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खाडीकिनारी आढळला मृतदेह

**पनवेल :** खारघर सेक्टर ८ मधील कानशेठची वाडी परिसरातील खाडीकिनारी एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, खारघर पोलिसांकडून मृताच्या नातेवाइकांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खारघर रेल्वे पुलाखालील खाडीकिनारी हा मृतदेह आढळला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून, प्राथमिक माहितीनुसार पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीची उंची अंदाजे पाच फूट पाच इंच असून, डोक्यावर टक्कल, बसके नाक आणि गोल चेहरा अशी तिची ओळख पटविण्यासाठीची वैशिष्ट्ये आहेत. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा कोणी बेपत्ता असल्याची माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### उदयराज चौधरी यांना मातृशोक



**माणगाव :** माणगाव येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा हॉटेल संगम रेस्टॉरंटचे मालक उदयराज शिवचरण चौधरी यांच्या मोतोश्री कमलादेवी शिवचरण चौधरी यांचे रविवारी (दि.११) त्यांच्या राहत्या घरी कचेरी रोड, शिवाजीनगर माणगाव येथे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने चौधरी कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दि.२० ऑक्टोबर रोजी, तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले.

### ज्योत्स्ना भालेराव यांचे निधन

**खांदेश्वर :** नाशिक जिल्हातील माडसांगवी येथील रहिवासी ज्योत्स्ना रामदास भालेराव (७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पती रेल्वे प्रशासन विभागात पोलीस अधिकारी या खात्यातून निवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पाच मुली, पाच जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने भालेराव व डांगळे कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून, नातेवाईक व परिचितांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.



# महामार्गांवर धावणार हवाई रुग्णवाहिका

## गोल्डन अवरमध्ये तातडीचे उपचार; समृद्धी, मुंबई-पुणे द्रुतगती आणि मुंबई-गोवा महामार्गांवर यंत्रणा

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच गोल्डन अवर, हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकणार आहे.



या प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात दरवर्षी सुमारे १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते. विशेषतः महामार्गांवरील गंभीर अपघात, वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.

समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

हवाई रुग्णवाहिका सेवेसह अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे, अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

रस्ते अपघात रोखणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहेच; मात्र अपघात घडल्यानंतर जखमींना वेळेत उपचार मिळणेही तितकेच महत्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वेगवान आपत्कालीन वैद्यकीय सेवांच्या मदतीने रस्ते अपघातांतील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याच्या नियोजनामुळे महामार्गांवरील आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे. रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावर होणाऱ्या अपघातांवेळी हवाई रूग्ण वाहिकेचा वापर तातडीने करता येणार आहे.

> “अपघातग्रस्तांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि केवळ मदत पोहोचण्यास झालेल्या विलंबामुळे कोणाचाही जीव जाऊ नये, यासाठी प्रभावी आणि सक्षम यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. प्रत्येक जीव अनमोल असून, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, या भूमिकेतून हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले आहेत.”
>
> प्रताप सरनाईक
> परिवहन मंत्री

# वरप ग्रामपंचायतीवर प्रशासन मेहरबान?

| पेण | प्रतिनिधी |



- **सरपंच, ग्रामसेवकाला पाठीशी घातल्याचा होतोय आरोप**
- **कागदोपत्री तपासणी, मात्र प्रत्यक्षात कारवाईची प्रतीक्षा!**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरप येथील विकासकामे व साहित्य खरेदीतील कथित अनियमिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. २०२३ पासून झालेल्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप उपसरपंच शोभा पांडुरंग दोरे यांच्यासह सात सदस्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केला होता. मात्र, विस्तार अधिकारी विक्रांती तांडेल यांनी दोन वेळा दप्तर तपासणी करूनही अद्याप अहवाल सादर केला नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकरणी नाराजी व्यक्त करत उपसरपंचांसह सात सदस्यांनी १२ ऑक्टोबर रोजी ग्रामसभेत सामूहिक राजीनामे देण्याची भूमिका घेतली होती. मात्र, गणसंख्या अपुरी असल्याचे कारण देत सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामसभा तहकूब केल्याने हा प्रश्न अनुत्तरित राहिला.

दप्तराची दोनदा तपासणी होऊनही अहवाल का सादर झाला नाही? कथित अनियमिततेबाबत प्रशासनाकडून ठोस भूमिका का घेतली जात नाही? असे सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्याशी तीन वेळा संपर्क साधला असता, माहिती उद्या देतो, असे सांगून टाळाटाळ होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

सरपंच गावात न राहता मुंबईत राहतात आणि बिल काढण्यासाठीच गावात येतात, असाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी करून तपासणी अहवाल सार्वजनिक करावा आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## लोणेरे विद्यापीठ गरब्यात रमले

**माणगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे गरबा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सोमवारी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत गरबा आणि दांडियाचा मनमुराद आनंद घेतला. रंगीबेरंगी पोशाख, आकर्षक रोषणाई, पारंपरिक संगीत आणि दांडियाच्या ठेक्यांमुळे विद्यापीठात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली, तसेच परस्परांतील स्नेह, एकोपा आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ झाली.



# दमखाडीत नाल्याचे काम रखडले

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा शहरातील दमखाडी नाका परिसरात नाल्याच्या रखडलेल्या दुरुस्तीच्या कामावरून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दोन दिवस काम सुरू राहतं, तर त्यानंतर अनेक दिवस काम बंद पडतं! या संथ कारभाराचा फटका स्थानिक दुकानदारांना बसत असून, आता लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे.

विशेष म्हणजे, हा परिसर प्रभाग क्रमांक नऊमध्ये येत असून, येथे भाजपचे नगरसेवक आहेत. तरीही नागरिकांना या समस्येचा सामना करावा लागत असल्याने स्थानिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. नाल्याचं काम नेमकं कधी पूर्ण होणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या परिसरात अनेक दुकाने आणि व्यावसायिक आस्थापने आहेत. दुरुस्तीच्या कामातील विलंब, वाहतुकीतील अडथळे आणि ग्राहकांची कमी झालेली वर्दळ यामुळे व्यापाऱ्यांचं आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे नुकसानभरपाईसाठी पुढाकार कोण घेणार, असा प्रश्नही आता उपस्थित होत आहे.

# कळंबोलीत साडीचोराचा धुमाकूळ!

| कळंबोली | प्रतिनिधी |

कळंबोली शहरातील व्यापारी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, गोकुळधाम सोसायटीतील पानेरी साडी दुकानाबाहेर ठेवलेल्या महागड्या साड्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. तब्बल १ लाख ७ हजार रुपये किमतीच्या साड्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्याने परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. दुकानाबाहेर नेहमीप्रमाणे ठेवलेल्या महागड्या साड्यांवर अज्ञात चोरट्याने दोन महिला साथीदारांच्या सहाय्याने डल्ला मारला. विशेष म्हणजे, चोरीची ही संपूर्ण घटना दुकानासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. चोरीचा माल नेण्यासाठी रिक्षा च वापर करण्यात आल्याचे मध्ये दिसत आहे. जेठाराम चौधरी यांनी याप्रकरणी तक्रार दिल्यानंतर कळंबोली पोलिसांनी ८ ऑक्टोबर रोजी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित चोरट्याचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. दुकानाबाहेर विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंच्या सुरक्षेकडे व्यापाऱ्यांनी विशेष लक्ष देण्याची गरज या घटनेतून अधोरेखित झाली आहे.

## पालीत धम्म मेळाव्याचे आयोजन

**पाली :** बौद्धजन पंचायत संस्थेच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन व चक्रवर्ती सम्राट अशोक विजया दशमी दिनाचे औचित्य साधून भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे पार पडणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान सुप्रीम कमिटी मुंबईचे अध्यक्ष मारुती गायकवाड भूषवणार असून स्वागताध्यक्ष दीपक पवार उपस्थित राहणार आहेत. तसेच धम्मदेसना मुंबईचे भंते बुद्ध बोधी यांच्या हस्ते होणार आहे.

# दक्षता जनजागृती शिबिरांचे आयोजन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

केंद्रीय दक्षता आयोगाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या दक्षता जनजागृती अभियान अंतर्गत बँक ऑफ इंडिया, रायगड विभागातर्फे विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाचा उद्देश भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम अधोरेखित करणे, पारदर्शकता व प्रामाणिकपणाला प्रोत्साहन देणे आणि नागरिकांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे.

या अभियानांतर्गत रायगडातील विविध बँक शाखांमार्फत तिसऱ्या टप्प्यातील दक्षता जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये बँकेच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित ग्राहक व नागरिकांना भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम, दैनंदिन जीवनातील प्रामाणिकपणाचे महत्त्व तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखण्याची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी वाढत्या संगणकीय आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीबाबत नागरिकांना विशेषतः सावध करण्यात आले. अनोळखी दुव्यांवरून संशयास्पद संचिका उतरविण्यास प्रवृत्त करणे, एकदाच वापरला जाणारा गोपनीय संकेतांक मिळवून बँक खात्यातील रक्कम लंपास करणे, डिजिटल अटकच्या नावाखाली भीती दाखवून पैसे उकळणे, इतरांच्या पैशांच्या बेकायदेशीर व्यवहारांसाठी बँक खात्यांचा वापर करणे तसेच अधिक परताव्याचे आमिष दाखवून बनावट गुंतवणूक योजनांमध्ये पैसे गुंतविण्यास प्रवृत्त करणे, अशा फसवणुकीच्या पद्धतींबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली.नागरिकांनी अनोळखी व्यक्तींचे दूरध्वनी, संदेश किंवा संशयास्पद दुव्यांवर विश्वास ठेवू नये. आपला गोपनीय संकेतांक, स्वयंचलित रोख वितरण यंत्राचा वैयक्तिक संकेतांक, परवलीचा शब्द किंवा बँकिंगशी संबंधित गोपनीय माहिती कोणाशीही सामायिक करू नये. तसेच अवास्तव परताव्याचे आमिष दाखविणाऱ्या गुंतवणूक योजनांपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले.

# समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी रिमोट लाईफ बोया

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडून रिमोट ऑपरेटेड लाईफ बोया उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या बचाव उपकरणांचे वितरण पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.



समुद्रात बुडण्याच्या किंवा पाण्यात अडचणीत सापडलेल्या पर्यटकांना तातडीने मदत पोहोचविण्यासाठी रिमोट ऑपरेटेड लाईफ बोया हे उपकरण उपयुक्त ठरते. हे उपकरण रिमोट कंट्रोलच्या साहाय्याने पाण्यातील संकटग्रस्त व्यक्तीपर्यंत पोहोचविता येते. त्यामुळे बचावकार्य अधिक जलद करण्यास आणि जीवरक्षकांच्या सुरक्षिततेस मदत होऊ शकते.

समुद्रकिनाऱ्यांवरील बचाव यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही उपकरणे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यात आली आहेत. अलिबाग, मुरुड व श्रीवर्धन नगरपरिषदा तसेच नागाव, काशीद, हरिहरेश्वर आणि दिवेआगर येथील ग्रामपंचायतींना या उपकरणांचे वाटप करण्यात आले. काशीद येथे दोन उपकरणे देण्यात आली आहेत.

उपकरणांचे वितरण केल्यानंतर अलिबाग समुद्रकिनारी जीवरक्षकांसाठी रिमोट ऑपरेटेड लाईफ बोया वापरण्याचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

# मोफत आरोग्य तपासणी शिबीर

| पोलादपूर | प्रतिनिधी |

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि पोलादपूर येथील आपला दवाखाना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवारी करण्यात आले.

तपासणी शिबिराचे उद्घाटन पोलादपूर तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर राहुल दवंडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आपला दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गुलाबराव सोनवणे, अमित वैद्य, उदय मधुसूदन खरे, पंकज बुटाला तसेच पोलादपूर शहरातील मान्यवर उपस्थित होते.

आपला दवाखाना यांचे कडून दर महिन्याला वालावलकर रुणालायाचे दर महिन्याला आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे डॉ. सोनावणे सांगितले. यासंदर्भात वालावलकर रुणालयाने शिबीर होण्यासाठी अनुकूलता दर्शवित यानंतरचे आरोग्य शिबीर २६ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

**२१ ऑक्टोबरपासून मोहिमेला प्रारंभ | आर्थिक समावेशन मोहिमेला गती**

# बँकांच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा, विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा तसेच कृषी कर्जवाटपाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय सल्लागार समिती आणि जिल्हास्तरीय आढावा समितीची बैठक जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. कृषी कर्जवाटप आणि आर्थिक समावेशन मोहिमेला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.



बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील बँकांच्या काम गिरीचा विविध महत्त्वपूर्ण निकषांवर सविस्तर आढावा घेतला. यामध्ये पीक कर्जवाटप, वार्षिक पत आराखड्याची उद्दिष्टपूर्ती, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्जवाटप तसेच विविध शासकीय योजनांमधील प्रलंबित प्रकरणांचा समावेश होता.

शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे, यासाठी बँकांनी किसान क्रेडिट कार्ड आणि इतर कृषी कर्जांचे वितरण जलदगतीने पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. तसेच कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत लागू असलेल्या मदत व सवलतींचा लाभ पोहोचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. केंद्र शासनाच्या आर्थिक समावेशनयोजनांचालाभअधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रायगड जिल्ह्यात २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत विशेष आर्थिक समावेशन मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व बँकांनी ग्रामपंचायती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून शिबिरांचे नियोजन करावे, नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी आणि आवश्यक निधीची तरतूद वेळेत करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व निश्चित केंद्रांवर शिबिरे आयोजित करून शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यावर त्यांनी भर दिला. या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या केंद्रांचे संबंधित बँकांना वाटप बैठकीत अंतिम करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक केंद्रावर नियोजनबद्ध पद्धतीने शिबिरे आयोजित करणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत विविध आर्थिक समावेशन योजनांचा लाभ पोहोचविणे सुलभ होणार आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते वार्षिक अहवालाचे अनावरण करण्यात आले. युवकांना कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यामध्ये आरएसईटीआयची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.जिल्ह्यातील कृषी कर्जवाटप, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि आर्थिक समावेशन मोहिमेची यशस्वी पूर्तता यासाठी सर्व बँका आणि शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

## निवडक



## सरसकट नुकसानभरपाई देण्याची शेतकरी प्रबोधिनीची मागणी

**कोर्लई :** मुरुड व अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई मिळावी, याबाबत मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी तर्फे तालुका अध्यक्ष ॲड.विनायक शेडगे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत पालकमंत्री भरत गोगावले यांना देण्यासाठी एक निवेदन मुरुड तहसिल कार्यालयात देण्यात आले. शेतकऱ्यांनी पावसाळ्यात भातपिकाची लावणी केली होती, परंतु पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकऱ्यांनी लावलेली भातशेती गर्भात असतानाच पाणी नसल्याने जमीन सुकून गेली आहे. त्यामुळे उभ्या शेतातील भातपीक सुकून उन्मळून पडली आहेत. शेतात २०२६ मध्ये भातपिकाची लागवड करून त्याकरिता लागणाऱ्या सर्व मेहनत, मशागत, खते इत्यादीची यावर्षी भरून न येणारे नुकसान झाले असून परतीच्या पावसाने न पडल्याने शेतकरी फार मोठ्या संकटात सापडला आहे. येथील शेतकरी अल्पभूधारक आहे. त्याचे कुटुंबाचे उदरनिर्वाह फक्त आणि फक्त भातशेतीवरच अवलंबुन आहे, पण भातशेतीच या वर्षी नसल्याने शेतकरी कष्टकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. पावसाअभावी भातपिकाचे नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई मिळावी, असे मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीचे मुरुड तालुका अध्यक्ष ॲड.विनायक शेडगे, सदस्य सुनील माळी, नथुराम शेडगे, अनंत शेळके, कैलास दिवेकर व इतर शेतकरी निवेदन देताना उपस्थित होते.

## शारदीय नवरात्रौत्सवात श्रीवर्धनमध्ये भाविकांची अलोट गर्दी

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरापासून अवघ्या ३ किमी अंतरावर गायगोठण परिसरातील मार्गावर, डोंगराच्या कुशीत आणि गर्द हिरव्या झाडीत वसलेले श्री कुसुमादेवी मंदिर हे संपूर्ण कोकणातील एक अत्यंत जागृत आणि श्रद्धास्थान मानले जाते.शारदीय नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेल्या मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात चतुर्भुजा महासरस्वती, अष्टभूजा महालक्ष्मी आणि चतुर्भुजा महाकाली या तिन्ही आदिशक्तींचे एकत्र रूप म्हणजेच श्री महाकुसुमादेवी विराजमान आहे.काळ्या पाषाणातील दीड ते दोन फूट उंचीच्या या अत्यंत नयनरम्य मूर्तींचे नवरात्रीत पूजन करण्यासाठी दूरदूरवरून भाविक येथे येतात.अख्यायिकेनुसार, अज्ञातवासात असताना पांडवांनी या अरण्यात पूजेसाठी या मंदिराची स्थापना केली होती. रानावनाच्या फुलांच्या (कुसुम) सान्निध्यात रमणारी देवता म्हणून तिला कुसुमादेवी असे नाव पडले.कौलारू छप्पर, समोर पटांगण आणि मागे वाहणारा ओढा अशा निसर्गरम्य व प्रसन्न वातावरणात हे मंदिर वसलेले आहे. नवरात्रोत्सवात नऊ दिवस मंदिरात देवीचा जागर सुरू असतो.दररोज देवीला मौल्यवान अलंकार, वस्त्रे आणि आकर्षक पुष्प आरास करून सजवले जाते.या नऊ दिवसांत विशेष होमहवन, भजन आणि धार्मिक कार्यक्रम पार पडतात.नवसाला पावणारी देवी अशी ख्याती असल्याने भाविक दर्शनासाठी व मनोकामना पूर्ण करण्यासाठी येथे हजेरी लावत आहेत.

## विवाहिता गळफास लावून मृत्यू प्रकरणात पतीसह पाच जणांवर गुन्हा

**पोलादपूर :** कोतवाल बुद्रुक येथील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांची सुन गार्गी दरेकर हिचा गळफास लावून मृत्यू झाला. तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी तिचा पती गणेश दरेकर यांच्यासह अन्य चार जणांवर गुन्हा दाखल झाला असून पतीला पोलिसांनी अटक करुन महाड न्यायालयात हजर केले असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. कोतवाल बुद्रुक येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मुरलीधर दरेकर यांच्या घरी मुलगा घराबाहेर गेला असताना सुनबाई गार्गी हिने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून गळफास लावून घेतल्याने तिचा मृत्यू झाला असल्याचे दिसून आले. यावेळी मृत विवाहित महिलेचा भाऊ खालापूर तालुक्यातील खांबेवाडी अंतर्गत गोळेवाडी येथील प्रथमेश दळवी याने कोतवाल बुद्रुक येथील मयत गार्गी दरेकर हिला आरोपी पती गणेश मुरलीधर दरेकर, मुरलीधर दरेकर, मनिषा दरेकर, मुन्नी पार्टे, श्रीकांत पार्टे यांनी शारीरीक, मानसिक तसेच वेळोवेळी पैशाची मागणी करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. याबाबत मृत विवाहितेच्या नातेवाईकांनी फिर्याद दिली. सदर गुन्ह्यातील आरोपी गणेश मुरलीधर दरेकर यांस मध्यरात्रीच्या सुमारास अटक करण्यात आली. ताराराणी ब्रिगेडच्या अध्यक्षा वंदना मोरे यांना भेटून मृत विवाहितेच्या नातेवाईकांनी कैफियत सांगितली आणि निवेदन दिले. मृत विवाहितेच्या नातेवाईकांच्यावतीने याप्रकरणी पाठपुरावा करण्यासाठी वंदना मोरे यांनी महाड उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे यांची भेट घेतली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सन स्टोन रीअल इस्टेट** अलिबाग ते मांडवा बंगलो+प्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp.चर्च बायपास रोड.
- **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८
- **नागाव येथे रिसोर्टमध्ये हाऊस किपिंग** या कामासाठी मुले पाहिजे आहेत आणि ऑल राऊंडर शेफ पाहिजे आहे. (मोबा. नं. ९३७१७१४५५२)
- **चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड** झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- **अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसमध्ये** वाडीत काम करणारे जोडपे हवे आहे. राहण्याची सोय आहे. संपर्क क्रमांक ९८२२९३८४४४
- **ऑफिस कामासाठी मुलगी हवी आहे.** मो. ७४९८५५५७४०, ९३७३७५८८५०
- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत.

**अनुक्रमांक 1, कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत कणकवली आणि कुडाळ स्थानकांवर प्रस्तावित लिफ्टसाठी वीजपुरवठा व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे काम. **टेंडर क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/30/2026 दिनांक 14.10.2026 अंदाजित खर्च** – ₹31,51,731/- (जीएसटी वगळून) **टेंडर फॉर्म शुल्क**–नाही, **ईएमडी** –₹63000/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 04/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनुक्रमांक 2, कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत गोडी नदी/एलसी-03 वरसगाव गेट आणि राजापूर स्थानक येथे वीजपुरवठा व्यवस्था पुरवठा, स्थापना, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करण्याचे काम. **टेंडर क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/29/2026 दिनांक 14.10.2026 अंदाजित खर्च** – ₹9,01,388/- (जीएसटी वगळून) **टेंडर फॉर्म शुल्क**–नाही, **ईएमडी** –₹18,000/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 04/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे मालक श्री. राजाराम भिकु भुसारी वगैरे ७ रा. वरई त.नीड, ता.कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे दहिगांव, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं/हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. एकूण क्षेत्र | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| २३/३ | ०-३९-५० | ४-०० |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक: १४/१०/२०२६ सही/-

**अ‍ॅड. गणपत का. फुलावरे अ‍ॅड.गीतांजली जी. फुलावरे**
**कार्यालय पत्ता: 'मधुतारा बिल्डींग' गाळा नं. ३**
**कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१**
**मो.८८८८०४५३७६/७७७५९९३०८८**

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग : २१८५/२१८७/२/२२००/१/२२०१/१६, एकूण क्षेत्र ५.०८.०० (आर. चौ.मी), आकारणी ५०.८० (रु.पैसे) ही बिनशेती मिळकत विद्यमान मालक श्री. अभिजित शशिकांत मोहिते व इतर यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, बयाणा पावती, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळहक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदती रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १४/१०/२०२६.

**(अ‍ॅड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी.स्टड जवळ, अलिबाग ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१, ९८५०४८१२३४

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
## जाहीर नोटीस

**जा.क्र.१०१७/२०२६**
**दि.१२/१०/२०२६**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | १००५/२ | कृष्णवाटिका बी विंग सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५५० चौ.फुट सदनिका | दिपाली दिलीप पेढवी, दिलीप अनंत पेढवी | प्राची पराग पाटील |
| २ | ५ | १९२०/१ | स्वामी दर्शन अपार्ट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ३५.५९ चौ.मी. सदनिका | विनोद गोपीनाथ ठाकूर, सुगंधा विनोद ठाकूर | कादंबरी समीर रावते, समीर सचिन रावते |
| ३ | १ | २१४४/४ | अमृता रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४५३.८१ चौ.फुट सदनिका | साहिल डेव्हलपर्सतर्फे रेणुका नामदेव पवार | राकेश गजानन म्हात्रे शुभांगी राकेश म्हात्रे |
| ४ | २ | १०१६/३ | ममता सह.गृह.संस्था | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ४१५ चौ.फुट सदनिका | रंजनीकांत हरिभाऊ पेके | राजश्री राजेंद्र कवळे |
| ५ | ६ | ७२५/४ | | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला,३०० चौ.फुट दुकानगाळा | किरण प्रेमजी गड्डा व इतर ५ | मनोज प्रेमजी गड्डा किरण प्रेमजी गड्डा |
| ६ | ३ | १६५१/१६ | युनिक १ सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ३२० चौ.फुट सदनिका | युनिक कंस्ट्रक्शनतर्फे अफजल अफजल हुसेन ए.जी.शेख | विजय स्वामीशरण सोनी |
| ७ | ४ | १७२४/१२ | सिंगल सोसायटी, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ४७८.६३ चौ.फुट सदनिका | रामदास राघोजी कुबडे विजया रामदास कुबडे | श्रेया तुकाराम ढेणे |
| ८ | २ | १५९३/१३ | श्वेता श्रेया सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ६५० चौ.फुट सदनिका | निलेश सुर्यकांत म्हात्रे, प्रविण भरत म्हात्रे | मंदार मुरलीधर राऊत आरती मंदार राऊत |
| ९ | २ | १५९३/१४/२ | श्वेता श्रेया सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ६१२ चौ.फुट सदनिका | अजिंक्य जनार्दन भेंडकर व इतर २ | सायली अजिंक्य भेंडकर |
| १० | २ | १५९३/१२ | श्वेता श्रेया सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला चौ. फुट सदनिका | विष्णू सोपान खर्चे | संगिता विष्णू खर्चे |
| ११ | ४ | १७३१/७ | गोल्ड कॉस्ट सोस | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४५० चौ.फुट सदनिका | दत्तात्रेय सिताराम फदाळे | युवराज शिल्पेश पोवळे |
| १२ | ५ | ६४६/४/१ | पिंपळभाट | पक्के सिमेंट बांधकाम घर मिळकत ५८८ चौ.फुट | उदय गोपीनाथ घरत | श्रद्धा किशोर पाटील किशोर विष्णू पाटील |
| १३ | २ | २१७३/५ | ॲकॉन्स प्रिवे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ३७७ चौ.फुट | अक्षण अरुण गुलाटी | माधुरी अजित पाटील |
| १४ | २ | ११०३/२ | विद्यानगर पश्चिम | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर | प्रविण चंद्रकांत वाघ | रोहिणी प्रविण वाघ |
| १५ | ५ | २१५३/९ | श्री सद्गुरु कबीर सागर भवन | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला ५४२.६६७१ चौ.फुट | संजय वैजनाथ मेहता, रणजितकुमार वैजनाथ मेहता, | अनया निलेश पाटील |
| १६ | २ | ९६४/१,२,३ | विद्यानगर पश्चिम | पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला ३७५ चौ.फुट | शारदा गणपत पवार | संतोष गणपत पवार |
| १७ | ६ | ७२८/१३ | बाफनाबाग सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम रो हाऊस १२३० चौ.फुट | अर्जुमन अकील काझी उर्फ अर्जुमनबानू अकील काझी | वफा मुजीबुल्लाह सिद्धीकी, हफिजा मुजीब ऊल्लाह सिद्धीकी |
| १८ | २ | | प्रमिला सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला सदनिका ९०५ चौ.फुट | रमाकांत रामचंद्र कुलकर्णी | शैलजा रमाकांत कुलकर्णी सुचित रमाकांत कुलकर्णी |
| १९ | ४ | | गोंधळपाडा चेंढरे | पक्के सिमेंट बांधकाम घर | आत्माराम विठोबा मोरे | संगीता आत्माराम मोरे |
| २० | २ | १६०/५ | आत्माराम नगर सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ७०५ चौ.फुट | नेहा नितीन रानडे व इतर ३ | रेखांश गजानन साईकर स्वप्नल रेखांश साईकर |
| २१ | २ | १९२/१/१, १९२/२/२ | नागडोंगरी चेंढरे | पक्के सिमेंट बांधकाम घर | जनार्दन बाळाराम कदम | युवराज जनार्दन कदम |
| २२ | ४ | १७९०/२ | उत्कर्ष वास्तू | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६५५ चौ.फुट | प्रसाद सनद घरत, नवनिता प्रसाद घरत | नमिता रोशन मानकर, रोशन रमाकांत मानकर |
| २३ | ३ | ११६०/१, ११६०/२ | गोकुळनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर | कांता एकनाथ मुळीक | एकनाथ अर्जुन मुळीक वगैरे ३ |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे ता.अलिबाग**

[redacted]

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

मौजे मुनवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. ४४, क्षेत्र ०.७८.७० (हे.आर.), पो.ख. ०.१३.३० (हे.आर.) एकूण क्षेत्र ०.९२.०० (हे.आर.), आकार ११.२१ (रु.पैसे) या मिळकती पैकी श्रीमती गुलाब गणेश पडते हिच्या मालकी व हिस्याचे क्षेत्र ०.२४.०० (हे.आर) आकार ३.४२ (रु.पैसे) आणि सदर मिळकतीत ये-जा करण्याकरिता मुनवली गट नं. ३९, ४२/१ आणि ४२/२ या मिळकतीतून १२ फुट रूंदीच्या पोहोच रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १४/१०/२०२६. **(अ‍ॅड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर, एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग : ३६/१/२/३३ एकूण क्षेत्र २.३२.०० (आर.चौ.मी), आकारणी १९.५० (रु.पैसे) ही बिनशेती मिळकती आणि त्यामधील ग्रामपंचायत चेंढरेकडील वर्णन असलेले मिळकत क्र.१९४१ ही मिळकत विद्यमान मालक श्रीमती सत्यभामा तुकाराम सराटे रा. पुणे यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशिलांनी विकत घेण्याबाबत बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बयाणा पावती दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळहक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे मुदती रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १४/१०/२०२६.

**(अ‍ॅड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१, ९८५०४८१२३४

### जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील श्री. योगेश मनसुखलाल पोपट, राहणार जुहू स्कीम, विलेपार्ले (प.), मुंबई ४०० ०४९ यांनी खाली अनुसूचीत वर्णन केलेली मिळकत (यापुढे ''सदर मिळकत'') तिचे मालक श्री. परशुराम आंबो ठोंबरे यांचे कडून, दि. ०२/०६/२०२६ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने (दस्त क्र.५५०१/२०२६, दुय्यम निबंधक, कर्जत) खरेदी करण्याचे मान्य केले असून सदर मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध प्राप्त केले आहेत. त्यापोटी माझ्या अशिलाने मोबदला अदा केला असून त्याची पोच मालकाने सदर खरेदीखतात दिली आहे.

१.सदर मिळकतीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये कोणास कोणताही हक्क, हितसंबंध, हिस्सा, मागणी, तारण, बोझा, लीज, बक्षीस किंवा अन्य कोणतीही हरकत असल्यास, त्याने आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत खाली सही करणारांस कळवावे; अन्यथा कोणाचाही हक्क किंवा हरकत नाही असे गृहीत धरून तो दावा सोडलेला समजला जाईल.

२. सर्व जनतेस सावध करण्यात येते की, सदर नोंदणीकृत खरेदीखत माझ्या असिलाच्या लाभात अस्तित्वात असल्याने, मालकास सदर मिळकत माझ्या अशिलाव्यतिरिक्त इतर कोणासही विकण्याचा, हस्तांतरित करण्याचा, गहाण/बक्षीस करण्याचा किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करण्याचा कोणताही हक्क नाही. असा कोणताही व्यवहार पूर्णतः रद्दबातल, माझ्या अशिलावर बंधनकारक नसेल, अशिलाच्या हक्कांच्या अधीन राहील व त्या व्यक्तीच्या स्वतःच्या जबाबदारीवर व खर्चाने राहील.

**मिळकतीचे अनुसूची (वर्णन)**

मौजे आसलपाडा (PU-ID 34384136083), ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्र. २३/६ (सर्व्हे क्र.२३, हिस्सा क्र.६), क्षेत्रफळ ० हे. ९५ आर ६० चौ.मी. (०.९५.६० हे.), खाते क्र. २५, भोगवटदार वर्ग-२, श्री. परशुराम आंबो ठोंबरे यांच्या नावे असलेली शेतजमीन, चतुःसीमाः

**अ‍ॅड. रवीन पालेकर**
२०१, हरलीन हाईट्स, राजे साहजी मार्ग, लाभ दर्शन बिल्डिंगजवळ,
दहिसर (पूर्व), मुंबई ४०००६८
मो.: +९१ ९८९२०५९७३६
ई-मेल : kbhansaliconsultancy@gmail.com

दिनांक : १३/१०/२०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत ही सामाईक मालकीची मिळकत असून सदर मिळकतीत श्रीमती सुरेखा शरद मुरकर यांचा असणारा अविभाज्य हिस्सा आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| किहिम ता.अलिबाग | २८३/२/३ | १-०५-१० पो.ख. ०-२६-५० एकुण १-३१-६० | १३.३६ |

वरील तपशीलात नमुद केलेल्या मिळकतीपैकी श्रीमती सुरेखा शरद मुरकर यांचा सामाईकातील अविभाज्य हिस्सा ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा, कुळवहिवाट, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, वहिवाट अथवा अन्य प्रकारचा कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहुन आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे

अलिबाग.
दिनांक १३/१०/२०२६ सही/-
ॲडव्होकेट
**अ‍ॅड. प्राजक्ता धिरज म्हात्रे**
**बी.ए.एलएल.बी.**
मु. ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं.१०६,
जिल्हा न्यायालय रायगड समोर अलिबाग
रायगड ४०२२०१, मो. ८८०६६९३५१५

[redacted]


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मधुकर भवानी बानाटे, मु. घर नंबर १५२८, विद्यानगर, वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१ यांच्याकडून खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| कुरूळ, ता. अलिबाग | १५/२ | ४-८०-०० | ४८.०० |

**एकूण ४-८०-०० चौ. मी. क्षेत्रापैकी श्री. मधुकर भवानी बानाटे यांच्या मालकीचे २-००-०० चौ. मी. क्षेत्र आकार २०.०० रु. पै.**

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग सही/-
दिनांक : / / २०२६
**अ‍ॅड. पराग मधुकर गुरव**
माधुमालती निवास, रामनाथ रोड,
ता. अलिबाग जि. रायगड
मोबा. ९३२६१३१४८०/८४४६८८०००९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान जमिन मालक व कब्जेदार १) श्री. जस्बीर तारलोचन ओभान व २) सौ. रेणू जस्बीर ओभान यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरले आहे. आमच्या अशिलांबरोबर त्यांनी सदर मिळकती बाबत साठेकरारदेखील स्वाक्षरीत केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| सोगांव | १२७/१/७ | ०-३०-०० (३,००० चौरस मीटर ) | ३००.०० |

सबब सदरच्या बिनशेती मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, ट्रस्ट, वारसा या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास संबंधितांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी पुराव्यासहीत पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष येऊन घ्याव्यात. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर, सदरची बिनशेती मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व जमिन मालकांच्या प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार आहे व सदर मिळकत कायम खरेदीखताने खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही आणि कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. संबंधितांनी त्यांच्या तथाकथित हरकती अगर तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्व लोकांस कळावे.

ता. १४/१०/२०२६ सही/-
**अ‍ॅड. माधवी नारायण ठाकूर.**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०१ २०१.

प्रोसेस फी जमा रू. ॲड. व्हि. जी. माळी
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. / २०२६

०१) श्री. सतीश रमेश भगत
वय - ५५, धंदा-नोकरी,
०२) कु. भावेश सतीश भगत
वय - २९, धंदा-शिक्षण,
०३) कु. मिहीर सतीश भगत — अर्जदार
वय - २३, धंदा-शिक्षण,
सर्व मु. ए२/१०४, जयदिप पार्क,
माझीवाडा विलेज रोड, फातीमा चर्चच्या
जवळ, माझीवाडा, ठाणे ४००६०१

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीस द्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, कै. सरीता सतीश भगत या अर्जदार क्र. १ यांची पत्नी आहे तर अर्जदार क्र. २ व ३ यांची आई आहेत. कै. सरीता सतीश भगत या दिनांक २६.१०.२०२२ रोजी मयत झाल्या. त्यांचे पश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांनी मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड व नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. के ६२९/अ, क्षेत्र १२०.४ चौ.मी. सत्ताप्रकार ए ६२८, क्षेत्र ६२.८ चौ.मी. सत्ताप्रकार ए, ६२८/१ क्षेत्र १९६.५ चौ.मी. सत्ताप्रकार ए, ६२९/ए, ६२९/१/ए/१, क्षेत्र ६२.८ चौ.मी. सत्ताप्रकार ए ६२९/१ बी, क्षेत्र ६२.८ चौ. मी. सत्ताप्रकार ए, या मिळकती मधील प्रस्तावित ''किष्णा मंदिर-ए को. -ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.'' या इमारती मधील तिसऱ्या मजल्या वरील निवासी सदनिका क्र. ३०१, क्षेत्र ६३० चौ. फुट बिल्टअप (ज्यास नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB००००१३९० जुना मालमत्ता क्र. Z1MKT००१३९२, १११५ असे वर्णन आहे) या मिळकती संदर्भात वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेटची) मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे शिवाय कै. सरीता सतीश भगत यांस अन्य कोणीही वारस नाहीत. सबब, या जाहीर समन्स द्वारे कळविणेत येते की, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे नावे असा वारस दाखला देण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक २०२६ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**वरिष्ठ लिपिक,** दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग — कोर्टाचा शिक्का — **अधिक्षक** दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग

# शुभमन अन् शेफाली आयसीसी 'प्लेअर ऑफ द मंथ'

। दुबई । वृत्तसंस्था ।

भारतीय वनडे आणि कसोटी कर्णधार शुभमन गिल आणि महिला क्रिकेट संघाची सलामी फलंदाज शेफाली वर्माला आयसीसीच्या सप्टेंबर महिन्यातील पुरुष आणि महिलांच्या श्रेणीत सर्वोत्कृष्ट क्रिकेटर म्हणून निवड करण्यात आली आहे. हे तिसऱ्यांदा घडले, जेव्हा भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेटर्सला एकत्रितपणे महिन्याच्या सर्वोत्कृष्ट खेळाडूच्या रुपात निवडण्यात आले.

गिलने वेस्ट इंडिजविरोधात वनडे मालिकेत शानदार कामगिरीनंतर सप्टेंबर महिन्यातील आयसीसीच्या सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जिंकला आहे. गिलने पाचव्यांदा हा सन्मान प्राप्त केला आहे. त्याने पुरुष गटात सर्वात जास्त वेळा हा पुरस्कार जिंकत आपला रेकॉर्ड पुढे नेला आहे. शेफाली वर्माने महिला आशिया चषक आणि एशियन गेम्समध्ये भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर दुसऱ्यांदा म हिन्यातीलव सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जिंकला आहे. गिलला मिळालेल्या पुरस्काराने वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूजसोबतच्या



२२ वर्षीय शफाली वर्मासाठीही सप्टेंबर २०२६ महिना यशस्वी राहिला. तिने या महिन्यात आशिया कप आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी केली. तिने दुसऱ्यांदा महिन्यातील सर्वोत्तम क्रिकेटपटूचा हा पुरस्कार जिंकला आहे. तिने सप्टेंबरमध्ये ७ टी २० सामने खेळताना ३६० धावा ठोकल्या. तसेच ६ विकेट्सही घेतल्या. ती आशिया कप २०२६ मध्ये सर्वाधिक २३६ धावा करणारी फलंदाज होती. तिने आशियाई क्रीडा स्पर्धेतही १८८ धावा केल्या. भारताने या दोन्ही स्पर्धा जिंकल्या, ज्यात शफालीचे योगदान महत्त्वाचे ठरले. तिने बांगलादेशविरुद्ध आशियाई क्रीडा स्पर्धेत शतकही केले.

रांगेत उभं केलं आहे.

सप्टेंबर २०२६ महिन्याचा सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटूच्या पुरस्कारासाठी शुभमन गिलसह भारताच्याच अभिषेक शर्मा आणि झिम्बाब्वेच्या सिकंदर रझा यांनाही नामांकन मिळाले होते. यातून अभिषेक आणि रझा यांना मागे टाकत गिलने हा पुरस्कार पटकावला आहे. दरम्यान, गिलने पाचव्यांदा आयीसीसचा महिन्यातील सर्वोत्तम क्रिकेटपटूचा पुरस्कार पटकावला आहे. त्याने यापूर्वी जानेवारी २०२३, सप्टेंबर २०२३, फेब्रुवारी २०२५ आणि जुलै २०२५ या महिन्यांचेही पुरस्कार जिंकले होते. त्यामुळे तो जगातील पहिलाच खेळाडू ठरला आहे, ज्याने ५ वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.

विशेष म्हणजे आत्तापर्यंत १७ वेळा एकूण ११ भारतीय खेळाडूंनी हा पुरस्कार जिंकला आहे. यातील गिलनेच ५ वेळा पुरस्कार जिंकला आहे. हा पुरस्कार जिंकल्यानंतर गिलने आनंद व्यक्त केला आहे. याशिवाय संघाच्या ऐतिहासिक विजयाचा भाग झाल्याबद्दलही त्याने आनंद व्यक्त करताना पुढच्यावर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्ड कपपर्यंत आणखी दर्जा उंचावायचा असल्याचे म्हटले. गिलने सप्टेंबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध दोन वनडे सामने खेळताना ३३३ धावा केल्या. त्याने एक शतक आणि एक द्विशतक ठोकले.

त्यानंतर गुवाहाटीला भारताने दुसऱ्या वनडेत इतिहास घडवला. वेस्ट इंडिजने दिलेले ४०६ धावांचे लक्ष्य सहज पार करत वनडेतील दुसरे सर्वात मोठे लक्ष्य यशस्वी पार करण्याचा पराक्रम केला. या सामन्यात गिलने १३३ चेंडूत नाबाद २२३ धावा करताना २६ चौकार आणि ८ षटकार मारले. हे त्याचे दुसरे द्विशतक ठरले.

> पाचव्या आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार जिंकत खूप छान वाटत आहे. मी या सन्मानासाठी पॅनलचे आभार मानतो. वनडे क्रिकेटमध्ये गती खूप वाढली आहे. आपल्याला तातडीने विचार करावा लागतो. परिस्थितीचा लगेच अंदाज बांधावा लागतो. खेळपट्टी आणि लक्ष्याच्या गरजेनुसार स्वतः वर नियंत्रण राखावे लागते.पुढील वर्षी दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या आयसीसी मेन्स क्रिकेट वर्ल्ड कपसोबतच आम्ही आपल्या पातळीला सर्वोत्तम करत राहणार आहोत.
> शुभमन गिल, कर्णधार

> आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ अवॉर्ड पुन्हा जिंकण एक अविश्वसनीय सन्मान आहे. आशिया चषक आणि एशियन गेम्समध्ये जिंकण्यासाठी एक भूमिका बजावणे चांगले राहिले आणि हा पुरस्कार जिंकल्यामुळे ते विजय आणखीन खास झालेत.मी येणाऱ्या महिन्यांसाठी खूप उत्साहित आहे. फेब्रुवारीत होणाऱ्या विमन्स चॅम्पियन्स ट्रॉफीम ध्ये आपली चांगली कामगिरी कायम राखण्याचा पक्का इरादा आहे. या स्पर्धेची मी आतुरतेने वाट पाहत आहे.
> शेफाली वर्मा, फलंदाज

## निवडक

### वेदक विद्यामंदिरचे सुयश



**तळा** : महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा परिषद, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत तळा येथील श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर या शाळेच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. आपल्या उत्कृष्ट आणि वेगवान खेळाच्याजोरावरया विद्यार्थिनींनी थेटमुंबई विभागीयस्तरावरझेपघेतली आहे. या अटीतटीच्या स्पर्धेत इनलाइन स्केटिंग प्रकारात कुमारी सई सुहास वावेकर हिने द्वितीय क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तर ११ वर्षे वयोगटातील क्वाड स्केटिंग प्रकारात कुमारी वैष्णवी सुरेश शिंदे हिने आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत रायगड जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवला. या दोन्ही विद्यार्थिनींची कामगिरी अत्यंत उल्लेखनीय ठरली असून, त्यांची पुढील मुंबई विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.शाळेचे मुख्याध्यापक महादेव लोकरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी दोन्ही विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

### जोस बटलरच्या डाव्या मांडीवर शस्त्रक्रिया

**लंडन** : इंग्लंडचा फलंदाज जोस बटलरच्या डाव्या हॅमस्ट्रिंगची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. त्याने पूर्ण तंदुरुस्त झाल्यानंतर दमदार पुनरागमन करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.३६ वर्षीय बटलरने सोमवारी आपल्या शस्त्रक्रियेची माहिती दिली. त्याने रुग्णालयातील खाटेवरून अंगठा उंचावत असलेला आपला फोटो शेअर केला. त्याचा डावा पाय ब्रेसमध्ये बांधलेला होता.बटलरने लिहिले, ङ्गशस्त्रक्रिया यशस्वी झाली असून आता रिकव्हरी सुरू आहे.



पूर्वीपेक्षा अधिक प्रेरित वाटत आहे. बटलरला ही दुखापत २४ सप्टेंबर रोजी हेडिंग्ले येथे श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात झाली होती. फलंदाजीदरम्यान तो दुखापतग्रस्त झाला आणि रिटायर्ड हर्ट झाला होता. बटलर पाकिस्तानमध्ये होणाऱ्या इंग्लंडच्या आगामी ट्राय-सिरीजमधून बाहेर पडला होता. इंग्लंडचा संघ या आठवड्याच्या अखेरीस पाकिस्तानला रवाना होईल.नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या इंग्लंडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातूनही बटलर बाहेर राहण्याची शक्यता आहे. या मालिकेसाठी संघाची घोषणा मंगळवारी सकाळी होणार आहे. बटलर आणि इंग्लंडचा आणखी एक अनुभवी व्हाइट-बॉल खेळाडू आदिल राशिद यांना इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाने एक वर्षाची करारवाढ दिली.या करारवाढीनंतर बटलरचा सध्याचा करार पुढील वर्षी दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या ५० षटकांच्या विश्वचषकापूर्वी संपणार आहे.

### भारत-श्रीलंका वनडे दिल्लीतच होणार

**मुंबई** : बीसीसीआयने भारत आणि श्रीलंका यांच्यात १३ डिसेंबर रोजी दिल्लीत होणाऱ्या पहिल्या एकदिवसीय सामन्याचे ठिकाण बदलल्याच्या वृत्ताचे खंडन केले आहे. बोर्डाचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले की, सामना दिल्लीहून अहमदाबादला हलवण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये सुरू असलेल्या बांधकामामुळे मैदान सामन्यासाठी तयार आहे की नाही, यावर प्रश्न उपस्थित झाले होते. त्यानंतर सामना अहमदाबादमध्ये खेळवला जाईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती.सैकिया यांनी सोमवारी सांगितले की, सामना अरुण जेटली स्टेडियममध्येच खेळवला जाईल. त्यांनी हेही स्पष्ट केले की, बीसीसीआयने द्विपक्षीय मालिकेतील सामन्यांची ठिकाणे निश्चित करण्यासाठी आपल्या मानक धोरणाचे पालन करते.अरुण जेटली स्टेडियममध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या कामाबाबत अशी शंका व्यक्त केली जात होती की,



१३ डिसेंबर रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्याचे यजमानपद भूषवण्यासाठी स्टेडियम वेळेत तयार होईल की नाही. याच आधारावर वृत्तांत असा दावा करण्यात आला की, पहिला वनडे अहमदाबादमध्ये खेळवला जाऊ शकतो. भारत आणि श्रीलंका यांच्यातील ही व्हाइट-बॉल मालिका १३ ते २७ डिसेंबरदरम्यान खेळवली जाणार आहे. यात ३ वनडे आणि ३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने समाविष्ट आहेत. वनडे मालिकेतील पहिला सामना दिल्ली, दुसरा बंगळुरू आणि तिसरा अहमदाबाद येथे खेळवला जाणार आहे.

## जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा

# पिल्लई एचओसीएल स्कूलचा दबदबा



। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनी येथील एचओसीएल मैदानावर पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करत स्पर्धेवर आपला दबदबा निर्माण केला. या स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघासह १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या संघांनी सांघिक विजेतेपद पटकावत क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधोरेखित केली.

या स्पर्धेत तिन्ही संघांनी उत्कृष्ट सांघिक खेळ, समन्वय, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिन्ही विजयी संघांची पालघर येथे होणाऱ्या मुंबई विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे आगामी विभागीय स्पर्धेतही पिल्लई एचओसी एल स्कूलचे खेळाडू आपली चमक दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

या यशामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. खेळाडूंनी मिळवलेल्या या यशामागे त्यांची नियमित मेहनत, शिस्त, संघभावना आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या डॉ. रीमा निकळजे, मॅनेजमेंट रिप्रेझेंटेटिव्ह आर. बी. पाटील आणि स्पोर्ट्स डायरेक्टर पद्माक्षण यांनी सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच व्हॉलीबॉल प्रशिक्षक तथा क्रीडा शिक्षक मनोज सिग्गू यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. जिल्हास्तरीय स्पर्धेतील या यशानंतर आता मुंबई विभागीय स्पर्धेतही विजयी घोडदौड कायम ठेवण्याचे लक्ष्य खेळाडूंसमोर आहे.

पिल्लई एचओसीएल स्कूलच्या या यशामुळे रसायनी परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## फुटबॉल चषकमध्ये गोल्सचा धडाका

। पुणे । प्रतिनिधी ।

बिशप्स को-एड स्कूल (उंड्री), लोयोला हायस्कूल आणि जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूल यांनी प्रतिस्पर्ध्यांवर गोलांचा वर्षाव करत लोयोला फुटबॉल चषक २०२६ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. सेंट व्हिन्सेंट्स हायस्कूल आणि विद्या भवन हायस्कूल यांनीही आपापल्या लढती जिंकून उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले.

लोयोला हायस्कूल, पाषाण येथील मैदानावर सोमवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या साम न्यांत बिशप्सच्या कौस्तुभ पंचारे आणि जे. एन. पेटिटच्या दानिश गोनाल यांनी हॅट्ट्रिक नोंदवत दिवस गाजवला. १४ वर्षांखालील गटात बिशप्स को-एड स्कूल, उंड्री संघाने द कल्याणी स्कूलचा ७-१ असा धुव्वा उडवला. कौस्तुभ पंचारेने हॅट्ट्रिक नोंदवत विजयात सिंहाचा वाटा उचलला. जेडन डेव्हिडने दोन गोल केले, तर सालिफ बेग आणि श्रेयान सिंग यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. कल्याणी स्कूलकडून अक्षज अगरवालने एकमेव गोल केला.

## स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली भारत सज्ज!

। रायपूर । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ लवकरच झिम्बाब्वेविरुद्ध वनडे आणि टी २० सामन्यांची सिरिज खेळणार आहे. झिम्बाब्वेचा महिला संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. भारतीय म हिला संघाची कमान आता स्मृती मंधानाच्या हातात असणार आहे. तिच्या नेतृत्वात भारतीय संघ आता मैदानात उतरणार आहे. रायपुरमध्ये हे तीनही सामने खेळवले जाणार आहेत. तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाची धुरा सांभाळणारी कर्णधार स्मृती मंधाना हिच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ विजयाचे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून मैदानात उतरणार आहे. झिम्बाब्वे संघ दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रायपूरमध्ये आगमन झाल्यानंतर दोन्ही संघ टी २० सिरिजआधी सराव करताना पाहायला मिळू शकतात.

**मालिकेचे सविस्तर वेळापत्रक**

- **पहिला टी-२० सामना: १६ ऑक्टोबर**
- **दुसरा टी-२० सामना: १८ ऑक्टोबर**
- **तिसरा व अंतिम सामना: २० ऑक्टोबर**

या सिरिजमध्ये तीन २० सामने खेळवले जाणार आहेत. हे सर्व सामने संध्याकाळी सुरू होणार आहेत. अवघ्या सहा दिवसांत एकापाठोपाठ एक तीन सामने होत असल्याने रायपूरसह संपूर्ण परिसरातील क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. क्रिकेट चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. भारतीय महिला क्रिकेट संघ आणि झिम्बाब्वे यांच्यातील आगामी टी २० आणि वनडे सिरिजचे वेळापत्रक जाहीर झाले. या दौऱ्याची सुरूवात १६ ऑक्टोबरपासून टी २० सिरिजने होणार आहे.







● अलिबाग शहरातील श्रीबाग येथे अंबा माता मंदिरासमोर मंगळवारी ( दि.१३) सायंकाळी दांडिया रास गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. गरब्यासाठी शहराच्या कानाकोपऱ्यातून अलिबागकरांनी हजेरी लावली होती.

## गोल्फादेवीवर एका गुणाने मात | शिवनेरी कबड्डी स्पर्धेत थरार

# पंचगंगाची सुपर सलामी!

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवांश मगरच्या पल्लेदार चढाया आणि वेदांत देसाईच्या पोलादी पकडीच्या जोरावर पंचगंगा सेवा मंडळाने शिवनेरी कबड्डी स्पर्धेच्या कुमार गटात विजयी सलामी दिली. अटीतटीच्या लढतीत पंचगंगाने गोल्फादेवी सेवा मंडळाचा ४८-४७ असा अवघ्या एका गुणाने पराभव केला. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्याने क्रीडाप्रेमींची उत्सुकता वाढवली.

शिवनेरी सेवा मंडळ, दादर यांच्या वतीने भवानी माता क्रीडांगणात आयोजित करण्यात आलेल्या या कबड्डी महोत्सवाचे यंदा ५८ वे वर्ष आहे. मानाच्या शिवनेरी कबड्डी स्पर्धेने दरवर्षी मुंबईतील कबड्डी हंगामाला सुरुवात होते. यंदाच्या



महोत्सवात विशेष व्यावसायिक, प्रथम श्रेणी व्यावसायिक, कुमार आणि महिला अशा चार गटांमध्ये सामने रंगणार आहेत. पहिल्या दिवशी कुमार गटातील चुरशीच्या सामन्यांनी लक्ष वेधून घेतले.

मुंबईच्या माजी महापौर आणि नगरसेविका किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी विधानसभाप्रमुख व निखिल लॉजिस्टिकचे व्यवस्थापक सुरेश कदम, स्थानिक नगरसेविका उर्मिला पांचाळ, सुनीता आयरे, हरदीपसिंग लाली, प्रशांत घाडीगावकर, मंडळाचे प्रमुख कार्यवाह व उपविभागप्रमुख नितीन पेडणेकर, अध्यक्ष सुयोगी नाईक, कार्याध्यक्ष विष्णू तांडेल, देविदास कदम, सचिन मांजरेकर, किरण मोरजकर, संजय माजरेकर, शाखाप्रमुख समीर दळवी आणि सुरेश काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पंचगंगा सेवा मंडळाने मध्यंतराला २४-२३ अशी एका गुणाची आघाडी घेतली होती. ही आघाडी त्यांनी अखेरपर्यंत टिकवून ठेवली. गोल्फादेवी सेवा मंडळाच्या गुडेटी मोजेस आणि जितेंद्र पाटील यांनी कडवी झुंज देत उत्तरार्धात जोरदार मुसंडी मारली. मात्र, अखेरच्या क्षणी विजयाचे पारडे पंचगंगाच्या बाजूने झुकले. पुढील फेरीत पंचगंगा सेवा मंडळासमोर यश क्रीडा मंडळाचे आव्हान असेल. यश क्रीडा मंडळाला पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली होती.

कुमार गटातील अन्य सामन्यांत समर्थ स्पोर्ट्स क्लबने संस्कृती प्रतिष्ठानचा ५३-३८ असा १५ गुणांनी पराभव केला. समर्थकडून चढाईत विराज कोंडावळे आणि पकडीमध्ये अथर्व मोहिते यांनी प्रभावी कामगिरी केली. संस्कृती प्रतिष्ठानकडून मनोज गोरे आणि सार्थक जाधव यांनी चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात गोकुळ क्रीडा मंडळाने वीर संताजी क्रीडा मंडळावर ४१-३८ अशी तीन गुणांनी मात केली. गोकुळकडून स्मित फाटक आणि दिव्यांश लाखन यांनी चढाईत, तर ऋषभ हजारे यांनी पकडीमध्ये मोलाचे योगदान दिले.

## एशियाडमधील घसरगुंडीवर मंथन होणार



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आशियाई क्रीडा स्पर्धेतील घसरलेल्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी क्रीडा मंत्रालयाने बैठक आयोजित केली आहे. क्रीडामंत्री म नसुख मांडविया यांच्या उपस्थितीत नेमकी चूक कुठे झाली, याचा शोध घेत उपाययोजनेवर मंथनदेखील होणार आहे.

भारताने ५०१ खेळाडूंचे पथक पाठविले होते. त्यांच्यावर तीन वर्षांपासून ७०० कोटींचा खर्च करण्यात आल्याचे क्रीडा मंत्रालयाने सांगितले.आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने ८५ पदके (२१ सुवर्णांसह) जिंकली. त्याआधी, हांगझाऊ येथे झालेल्या स्पर्धेतील १०६ पदकांच्या विक्रमी आकड्याच्या तुलनेत ही संख्या फार कमी आहे.

भारताच्या २१ सुवर्णपदकांपैकी ११ सुवर्णपदके ही शेवटच्या दोन दिवसांत तिरंदाज, पुरुष व महिला हॉकी संघ, बॉक्सर आणि महिला गोल्फर यांच्या दमदार कामगिरीमुळे मिळाली.बॅडमिंटन, शूटिंग आणि ॲथलेटिक्समधील अनुभवी खेळाडूंच्या निराशाजनक कामगिरीवर चर्चा अपेक्षित असेल.बॅडमिंटनमध्ये भारताला केवळ पुरुषांच्या संघाने जिंकलेले एक कांस्यपदक मिळाले.

## जामिनावर सुटला अन् शतकवीर झाला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बंगालचा यष्टीरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेलने दिल्लीविरुद्धच्या रणजी ट्रॉफी सामन्यात शानदार शतक झळकावले. पोरेल मैदानावर गुडघे टेकून रडू लागला. काही काळापासून कायदेशीर कारवाईला सामोरे जात असलेल्या पोरेलने सांगितले की, त्याला रडायचे नव्हते, पण तो आपले अश्रू रोखू शकला नाही. तो म्हणाला की या कठीण काळात तो मानसिकदृष्ट्या अधिक कणखर झाला आहे. दिल्लीविरुद्धच्या रणजी ट्रॉफी गट कफ्सामन्यात पोरेलने उत्कृष्ट फलंदाजी केली. शतक पूर्ण केल्यानंतर त्याला अश्रू अनावर झाले. दिवसाचा खेळ संपल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत तो म्हणाला की, मला रडायचे नव्हते, पण अश्रू आपोआपच बाहेर आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)